मृत्युपत्र

१. हिंदू धर्मिय व्यक्तीच्या मृत्युपत्राबातच्या तरतुदी:

♦ भारतात मृत्युपत्र कसे असावे किंवा मृत्युपत्राने वारसा कसा प्राप्त होतो यासंबंधी भारतीय उत्तराधिकार कायदा, १९२५ मध्ये चर्चा केलेली आहे.

♦ एखाद्या व्यक्तीने, त्याच्या मृत्युनंतर, त्याच्या मालकीच्या संपत्तीचे वाटप कसे व्हावे याबाबत घोषित केलेली इच्छा म्हणजे मृत्युपत्र.

♦ मृत्युपत्र साध्या कागदावरही करता येते. ते नोंदणीकृतच असावे असे कोणतेही बंधन कायद्यात नाही.

♦ नोंदणी कायदा १९०८, कलम १८ अन्वये मृत्युपत्राची नोंदणी वैकल्पिक आहे.

♦ मृत्युपत्र करणारा हयात असेल तर त्याला कधीही मृत्युपत्र नोंदवून घेता येते.

♦ मृत्युपत्राकडे सामान्य दस्तऐवजांपेक्षा वेगळा विशिष्ट दस्तऐवज म्हणून बघितले जावे.

♦ मृत्युपत्र एक असे घोषणापत्र आहे की ज्याव्दारे मृत्युपत्र करणाऱ्याने त्याच्या मृत्युनंतर त्याच्या मालमत्तेबाबत करण्यात येणाऱ्या व्यवस्थेची इच्छा व्यक्त केलेली असते.

♦ मृत्युपत्र एक असा दस्तऐवज आहे जो मयत व्यक्तीच्या इराद्याची किंवा इच्छांची अंमलबजावणी करण्यासाठी, त्याच्या मागे जिवंत असलेल्या व्यक्तींना दिला जातो.

♦ मृत्युपत्र म्हणजे मयत व्यक्तीची शेवटची इच्छा असते. मयत व्यक्तीचा असा इरादा त्याच्या इच्छेनुसार अत्यंत आदराने आणि पवित्रतेने अंमलात आणला गेला पाहिजे.

२. कायदेशीर तरतूद:

♦ भारतीय उत्तराधिकार कायदा १९२५, भाग ६ मध्ये कलम ५७ पासून मृत्युपत्राबाबत तरतुदी दिलेल्या आहेत.

♦ भारतीय उत्तराधिकार कायदा १९२५, कलम ५७ म्हणजे हिंदू विल्स एक्ट, १८७० च्या कलम २ ची पुनरावृत्ती आहे.

♦ भारतीय उत्तराधिकार कायदा, १९२५ भारतातील सर्व धर्मियांना म्हणजे हिंदू, ख्रिश्चन, पारशी, अँग्लो इंडियन्स इ. यांना लागू होतो. हिंदू या संज्ञेमध्ये बौद्ध, शिख, जैन, ब्राम्होसमाजी, आर्यसमाजी, नंबुद्री, लिंगायत यांचाही समावेश होतो व या सर्वांना हा कायदा अंशत: लागू पडतो.

♦ मुस्लिम धर्मिय व्यक्तींना हा कायदा पूर्णपणे लागू पडत नसला तरी प्रोबेट, लेटर्स ऑफ एडमिनिस्ट्रेशन इ. साठी लागू आहे. जेथे व्यक्तीगत कायद्यानुसार वारसासंबंधी प्रश्न निर्माण होत नाहीत तेथे मृत्युपत्रासाठी भारतीय वारसा कायदा १९२५ च्या तरतुदी लागू होतात.

DR. SANJAY KUNDETKAR, Dy. Collector

♦ भारतीय उत्तराधिकार कायदा १९२५, कलम- २ (ह) अन्वये मृत्युपत्र-इच्छापत्राची व्याख्या खालीलप्रमाणे दिलेली आहे.

''मृत्युपत्र म्हणजे मृत्युपत्र करणाऱ्या व्यक्तीने, त्याच्या मृत्युनंतर त्याच्या सर्व प्रकारच्या मालमत्तेची विल्हेवाट कशी लावावी यासंबंधीची कायदेशीरपध्दतीने घोषित केलेली इच्छा होय.''

३. मृत्युपत्राचे प्रमुख प्रकार:

(ए) संयुक्त मृत्युपत्र (Joint Will): जेव्हा एकापेक्षा जास्त व्यक्ती, एकाच लेखाने, त्यांच्या मृत्युनंतर, त्यांच्या संपत्तीची विल्हेवाट कशी लावावी याबाबत लेख करतात त्याला संयुक्त मृत्युपत्र म्हणतात. अशा व्यक्तींपैकी ज्याचा मृत्यू होईल, त्या व्यक्तीच्या संपत्तीबद्दल मृत्युपत्रातील भाग प्रभावित होईल.

(बी) पारस्परिक मृत्युपत्र (Mutual Will): जेव्हा दोन व्यक्ती, एकाचा मृत्यू झाल्यावर दुसऱ्याला त्याची संपत्ती मिळेल या आशयाचा लेख करतात त्याला पारस्परिक मृत्युपत्र म्हणतात.

(सी) स्वलिखित मृत्युपत्र (Holographic Will): पूर्णत: स्वहस्ताक्षरात लिहिलेल्या मृत्युपत्राला स्वलिखित मृत्युपत्र म्हणतात.

(डी) नोंदणीकृत मृत्युपत्र (Registered Will): नोंदणी कायदा, १९०८, कलम १७ अन्वये नोंदणी केलेल्या मृत्युपत्राला नोंदणीकृत मृत्युपत्र म्हणतात. मृत्युपत्राची नोंदणी करता येते, रुपये पाचशेच्या स्टँप पेपरवर मृत्युपत्र नोंदणीकृत केलेले असल्यास पुढे कायदेशीर अडचणी उद्भवत नाहीत. तथापि, नोंदणी कायदा, १९०८, कलम १८ अन्वये मृत्युपत्र नोंदणीकृत असणे आवश्यक नाही.

(इ) जमा केलेले मृत्युपत्र (Deposited Will): मृत्युपत्र, पाकीटात बंद/सील करुन दुय्यम निबंधकाकडे जमा करता येते. याला जमा केलेले मृत्युपत्र म्हणतात.

● **नोंदणी कायद्यातील तरतूद:**

♦ कोणताही मृत्युपत्रकर्ता, त्याचे मृत्युपत्र, मोहोरबंद लिफाफ्यामध्ये, त्यावर मृत्युपत्र करणाऱ्याचे आणि त्याच्या प्रतिनिधीचे नाव लिहून, दस्तऐवजाच्या स्वरूपात निवेदनासह एक तर स्वतः किंवा त्याच्या प्राधिकृत अभिकर्त्यामार्फत मृत्युपत्र निबंधकाकडे जमा करू शकेल *(नोंदणी कायदा १९०८, कलम ४२)*

♦ असा लिफाफा प्राप्त झाल्यावर, निबंधक असे मृत्युपत्र जमा करण्यासाठी सादर करणारी व्यक्ती ही, मृत्युपत्रकर्ता किंवा त्याचा अभिकर्ता आहे अशी खात्री पटल्यास, तो आपल्या नोंदणी पुस्तक क्रमांक- ५ मध्ये उपरोक्त पत्ता लिहून घेईल आणि त्याच नोंदणी पुस्तकामध्ये व उक्त लिफाफ्यावर ते सादर केल्याचे व प्राप्त झाल्याचे वर्ष, महिना, दिवस व वेळ आणि जो मृत्युपत्रकर्त्याची किंवा त्याच्या अभिकर्त्याची ओळख पटवून घेईल आणि त्यांची नावे आणि मोहरबंद लिफाफ्यावर लिहून ठेवील.
त्यानंतर निबंधक, मोहरबंद लिफाफा आपल्या आगप्रतिबंधक पेटीमध्ये जतन करून ठेवील. *(नोंदणी कायदा १९०८, कलम ४३)*

Dr. SANJAY KUNDETKAR, Dy. Collector

♦ ज्याने कलम ४२ अन्वये, मोहोरबंद लिफाफा निक्षेपित केला आहे अशा मृत्युपत्र कर्ताचा मृत्यू झाल्यास, ज्या निबंधकाकडे मृत्युपत्र जमा केले होते त्याच्याकडे मृत्युपत्राचा मोहोरबंद लिफाफा उघडण्यासाठी अर्ज करता येईल आणि मृत्युपत्रकर्ता मयत झाला आहे अशी निबंधकाची खात्री पटल्यानंतर, तो अर्जदाराच्या उपस्थितीत मृत्युपत्राचा मोहोरबंद लिफाफा उघडेल आणि अर्जदाराच्या खर्चाने त्यात अंतर्भूत असलेल्या मृत्युपत्राच्या नकला, त्याच्याकडील पुस्तक क्रमांक ३ मध्ये लावून ठेवील. अशी नक्कल करण्यात येईल तेव्हा निबंधक मूळ मृत्युपत्र अर्जदाराकडे देईल. *(नोंदणी कायदा १९०८, कलम ४५)*

(एफ) विशेष मृत्युपत्र (Privileged Will): भारतीय उत्तराधिकार कायदा १९२५, कलम ६५ अन्वये एखाद्या सैनिकाने प्रत्यक्ष युद्धाच्या वेळेस किंवा विशेष मोहीमेवर असतांना, किंवा एखाद्या सज्ञान दर्यावर्दीने जहाजावर असतांना किंवा एखाद्या वैमानिकाने, विमानात असतांना केलेल्या मृत्युपत्राला विशेष मृत्युपत्र म्हणतात.

♦ भारतीय उत्तराधिकार कायदा १९२५, कलम ६६ अन्वये असे विशेष मृत्युपत्र लेखी अथवा तोंडी असू शकते.

♦ जर असे मृत्युपत्र वर नमूद व्यक्तींनी स्वहस्ताक्षरात लिहिलेले असेल तर त्यावर त्याची स्वाक्षरी असण्याची आणि ते साक्षीदारांमार्फत साक्षांकीत असण्याची आवश्यकता नसते.

♦ जर अशा मृत्युपत्राचा काही भाग वर नमूद व्यक्तींच्या स्वहस्ताक्षरात असेल आणि काही भाग इतर व्यक्तीने लिहिला असेल आणि त्याखाली असे मृत्युपत्र करणाऱ्या व्यक्तीची स्वाक्षरी असेल तर ते साक्षीदारांमार्फत साक्षांकीत असण्याची आवश्यकता नसते.

♦ विशेष मृत्युपत्र जर इतर व्यक्तीने लिहिले असेल आणि त्याखाली असे मृत्युपत्र करणाऱ्या व्यक्तीची स्वाक्षरी नसेल आणि असे विशेष मृत्युपत्र, वर नमूद व्यक्तींच्या निर्देशानुसार लिहिले गेले असे सिध्द करण्यात आले तर असे विशेष मृत्युपत्र विधीग्राह्य मृत्युपत्र समजण्यात येते.

४. मृत्युपत्र करण्यास सक्षम व्यक्ती:

भारतीय उत्तराधिकार कायदा १९२५, कलम- ५९ अन्वये:

♦ मृत्युपत्र करणारी व्यक्ती वयाने सज्ञान असावी तसेच तिचे मानसिकदृष्ट्या सुदृढ असावी.

♦ मूक किंवा बधीर किंवा अंध व्यक्ती, जर त्यांना परिणामांची जाणीव असेल तर, मृत्युपत्र करु शकतात.

♦ मृत्युपत्र स्वसंपादित संपत्तीबाबत तसेच वंशपरंपरेने मिळालेल्या संपत्तीतील फक्त स्वत:च्या हिश्शाबाबत करता येते.

♦ हिंदू वारसा कायदा, १९५६, कलम ३० अन्वये हिंदू व्यक्तीला एकत्र कुटुंबाच्या मिळकतीमधील स्वत:च्या हिश्शाबाबत मृत्युपत्र करता येते.

♦ वेडसर व्यक्ती, जेव्हा वेडाच्या भरात नसेल तेव्हा मृत्युपत्र करु शकते. परंतु वेडाच्या भरात, नशेत, आजारात, शुद्धीवर नसताना, फसवणुकीने, दबावाखाली करण्यात आलेले मृत्युपत्र विधीग्राह्य असणार नाही.

Dr. SANJAY KUNDETKAR, Dy. Collector

♦ हिंदू वारसा कायदा १९५६ कलम १४ अन्वये, हिंदू वारसा कायदा १९५६ अंमलात येण्यापूर्वी किंवा अंमलात आल्यानंतर, कोणत्याही हिंदू स्त्रिची, तिच्या कब्जात असलेली कोणतीही संपत्ती, मग अशी मालमत्ता तिला, कोणत्याही अटी/शर्ती विना, विवाहापूर्वी किंवा विवाहानंतर वारसाहक्काने, मृत्युपत्रीय दानाने, वाटणीमध्ये, पोटगी म्हणून, नातलगांकडून मिळालेली असो किंवा तिने अशी मालमत्ता स्वत:च्या कौशल्याने, परिश्रमाने कमावलेली असो किंवा एखादी संपत्ती दान म्हणून, मृत्युपत्रान्वये, इतर कोणत्याही लेखान्वये, दिवाणी न्यायालयाच्या हुकूमनाम्यान्वये, आदेशान्वये किंवा एखाद्या निवाड्यान्वये संपादित केली गेली असेल किंवा अन्य कोणत्याही मार्गाने संपादित केलेली असो, अशी संपत्ती, ती हिंदू स्त्री संपूर्ण स्वामी म्हणून धारण करील, मर्यादित स्वामी म्हणून नव्हे. त्यामुळे कोणत्याही हिंदू स्त्रीला वरील प्रमाणे प्राप्त झालेल्या मिळकतीचे मृत्युपत्र करता येईल.

५. मृत्युपत्र कसे असावे:

भारतीय उत्तराधिकार कायदा १९२५, कलम- ६३ अन्वये:

♦ मृत्युपत्रावर, मृत्युपत्र करणाऱ्या व्यक्तीने, मृत्युपत्र त्याने स्वत: केले आहे हे दर्शविण्याची निशाणी म्हणून त्यावर किमान दोन किंवा अधिक साक्षीदारांसमक्ष स्वाक्षरी किंवा अंगठा किंवा इतर निशाणी केलेली असावी. मृत्युपत्र करणारी व्यक्ती जर स्वाक्षरी करण्यास असमर्थ असेल तर, इतर कोणतीही व्यक्ती, मृत्युपत्र करणाऱ्या व्यक्तीच्या निर्देशानुसार, मृत्युपत्र करणाऱ्या व्यक्तीच्या समक्ष किंवा नंतर मृत्युपत्रावर स्वाक्षरी करु शकते.

♦ किमान दोन किंवा अधिक साक्षीदारांनी, त्यांची नावे, वय, पत्ता व स्वाक्षरीसह, असे मृत्युपत्र साक्षांकीत केलेले असावे. तथापि, फक्त साक्षीदारांनी मृत्युपत्र साक्षांकित करणे पुरेसे नाही तर मृत्युपत्र साक्षांकित करणाऱ्या साक्षीदारांनी, मृत्युपत्र करणाऱ्या व्यक्तीला मृत्युपत्रावर स्वाक्षरी करतांना बघणेही आवश्यक आहे. थोडक्यात मृत्युपत्र करणाऱ्या व्यक्तीने, मृत्युपत्र साक्षांकीत करणाऱ्या साक्षीदारांच्या समक्ष मृत्युपत्रावर स्वाक्षरी करावी. मृत्युपत्र किमान दोन साक्षीदारांमार्फत साक्षांकीत केलेले असणे अनिवार्य आहे.

♦ मृत्युपत्रात उल्लेख केलेल्या मिळकतीबाबत पुरेसे आणि निश्चित वर्णन मृत्युपत्रात असावे.

♦ मृत्युपत्रात उल्लेखित मिळकत मृत्युपत्र करणाऱ्याकडे कशी आली आणि मृत्युनंतर त्या मिळकतीची विल्हेवाट कोणी व कशी लावावी याबाबत स्पष्ट उल्लेख असावा.

♦ मृत्युपत्रात शेवटी, मृत्युपत्र स्वतंत्रपणे, शारीरिक व मानसिकरित्या सुदृढ असतांना आणि विचारपूर्वक केलेले असल्याचा उल्लेख असावा.

♦ मृत्युपत्रात शेवटी किंवा स्वतंत्रपणे, मृत्युपत्र करणारी व्यक्ती, मृत्युपत्र करण्यास, शारीरिक व मानसिकरित्या सुदृढ असल्याबाबत डॉक्टरचे प्रमाणपत्र असावे. असे प्रमाणपत्र मृत्युपत्राचाच भाग असावा. तथापि, डॉक्टरच्या प्रमाणपत्राचा उल्लेख मूळ कायद्यात नाही. परंतु असे प्रमाणपत्र असल्यास पुढे कायदेशीर अडचणी उद्भवत नाहीत.

DR. SANJAY KUNDETKAR, Dy. Collector

♦ हिंदू व्यक्ती स्वसंपादित संपत्तीबाबत तसेच वंशपरंपरेने मिळालेल्या संपत्तीतील फक्त स्वत:चा हिस्सा, अशा एकूण मिळकतीची विल्हेवाट कशी लावावी यासाठी मृत्युपत्र करू शकते.

♦ मृत्युपूर्वी मृत्युपत्रात बदल करणे, ते रद्द करणे, नष्ट करणे, नवीन मृत्युपत्र करणे इत्यादी करण्याचे अधिकार मृत्युपत्र करणाऱ्या व्यक्तीला असतात. भारतीय उत्तराधिकार कायदा १९२५ कलम- ६२ अन्वये, मृत्युपत्र करणारी व्यक्ती, त्याने केलेले मृत्युपत्र रद्द करु शकते किंवा त्यात कितीही वेळा बदल किंवा दुरुस्ती करू शकते.

♦ आधीचे मृत्युपत्र रद्द करुन नवीन मृत्युपत्र करतांना, "आधीचे, दिनांक ...रोजी केलेले मृत्युपत्र रद्द समजावे" असा उल्लेख नवीन मृत्युपत्रात असणे अपेक्षीत आहे.

♦ एकाच व्यक्तीने, एकापेक्षा जास्त मृत्युपत्र केले असतील तर त्याने सर्वात शेवटच्या दिनांकास केलेले मृत्युपत्र ग्राह्य मानले जाते.

६. साक्षीदार वारस:

भारतीय उत्तराधिकार कायदा १९२५, कलम ६८ अन्वये कोणत्याही मृत्युपत्रावर साक्षीदार म्हणून स्वाक्षरी करणाऱ्या व्यक्तीला, त्या मृत्युपत्रात नमूद संपत्तीत वाटा मिळत असल्यास किंवा अशा साक्षीदार व्यक्तीला, मृत्युपत्र करणाऱ्या व्यक्तीने मृत्युपत्राचा व्यवस्थापक (Executor) म्हणून नेमलेले असले तरी तिच्या साक्षीदार असण्यावर परिणाम होणार नाही.

७. मृत्युपत्राचा अंमल:

♦ कोणतेही मृत्युपत्र हे मृत्युपत्र करणाऱ्या व्यक्तीच्या मृत्युनंतरच अंमलात येऊ शकते, त्याच्या हयातीत मृत्युपत्र कधीही अंमलात येत नाही. त्यामुळे मृत्युपत्र केलेल्या इसमाची वारस नोंद करतांना शक्यतोवर मूळ मृत्यु प्रमाणपत्राची मागणी करावी.

८. कोडिसिल (Codicil):

भारतीय उत्तराधिकार कायदा १९२५ कलम ७० अन्वये,
कोडिसिल म्हणजे एक असा दस्त ज्याद्वारे मृत्युपत्रातील मजकुरासंबंधात स्पष्टीकरण दिलेले आहे किंवा बदल केलेला आहे किंवा अधिक माहिती जोडलेली (add) आहे. कोडिसिलचा दस्त मृत्युपत्राचा एक भाग मानला जातो. कोडिसिल म्हणजे एक कायदेशीर दस्तऐवज जो एखाद्या व्यक्तीचे मृत्युपत्र नव्याने तयार न करता त्याच्या मृत्युपत्रामध्ये बदल करू देतो. मृत्युपत्रात माहिती जोडण्यासाठी, कमी करण्यासाठी किंवा सुधारण्यासाठी कोडिसिलचा वापर केला जातो. त्यामुळे सामान्यतः मृत्युपत्राप्रमाणेच कोडिसिलवर साक्षीदारांची स्वाक्षरी आवश्यक असते.

९. मृत्युपत्रातील लेखन प्रमाद:

भारतीय उत्तराधिकार कायदा १९२५, कलम ७६ अन्वये, मृत्युपत्रातील नाव, क्रमांक इत्यादींबाबतचा लेखन प्रमाद, त्याचा नेमका अर्थ लक्षात येत असेल तर दुर्लक्षित करण्यात यावा.

Dr. SANJAY KUNDETKAR, Dy. Collector

१०. मृत्युपत्रातील विसंगत प्रदाने:

भारतीय उत्तराधिकार कायदा १९२५, कलम ८८ अन्वये जर एखाद्या मृत्युपत्रात नमूद दोन कलमात नमूद इच्छा/ दाने विसंगत असतील आणि त्या दोन्ही इच्छा एकत्रपणे पूर्ण करणे शक्य नसेल तर शेवटी नमूद इच्छा विधिग्राह्य ठरेल.

● उदाहरण - १. एका मृत्युपत्र करणाऱ्या व्यक्तीने, त्याच्या मृत्युपत्रातील पहिल्या कलमामध्ये, त्याची 'क्ष' ठिकाणी असणारी मालमत्ता 'अ' ला द्यावी असे नमूद केले आणि त्याच मृत्युपत्रात, दुसऱ्या कलमामध्ये, त्याची 'क्ष' ठिकाणी असणारी मालमत्ता 'ब' ला द्यावी असे नमूद केले.

एकच मालमत्ता एकत्रपणे दोघांना देणे शक्य नसल्याने ही दोन्ही कलमे विसंगत ठरतात व शेवटचे कलम विधिग्राह्य ठरुन अशी मालमत्ता 'ब' ला मिळेल.

● उदाहरण - २. एका मृत्युपत्र करणाऱ्या व्यक्तीने, त्याच्या मृत्युपत्रातील पहिल्या कलमामध्ये, त्याची 'क्ष' ठिकाणी असणारे घर 'अ' ला द्यावे असे नमूद केले आणि त्याच मृत्युपत्रात, शेवटच्या कलमामध्ये असे नमूद केले की, त्याचे 'क्ष' ठिकाणी असणारे घर विकून टाकावे आणि येणाऱ्या रक्कमेचा विनियोग 'ब' साठी करण्यात यावा.

एकच घर 'अ' ला देणे आणि तेच घर विकून येणाऱ्या रक्कमेचा विनियोग 'ब' साठी करणे या दोन्ही गोष्टी एकत्र करणे शक्य नसल्याने ही दोन्ही कलमे विसंगत ठरतात व शेवटचे कलम विधिग्राह्य ठरुन घर विकून येणाऱ्या रक्कमेचा विनियोग 'ब' साठी करणे विधिग्राह्य ठरेल.

♦ **नाते** (Relations):

भारतीय उत्तराधिकार कायदा १९२५, कलम ९९ अन्वये नात्यांची व्याख्या दिलेली आहे.

♦ **गर्भस्थ शिशू:**

हिंदू डिस्पोझिशन्स ऑफ प्रॉपर्टी एक्ट, १९१६ च्या तरतुदी अस्तित्वात असल्याने गर्भस्थ शिशूच्या नावे मृत्युपत्र करता येते.

♦ **स्वमिळकत:**

भारतीय उत्तराधिकार कायदा १९२५, कलम १५२ अन्वये, फक्त स्वत:च्या मालकीच्या मिळकतीचे किंवा मिळकतीतील स्वत:च्या हिश्शापुरतेच मृत्युपत्र करता येते.

११. प्रोबेट-मृत्युपत्राची शाबिती (Probate of Will):

♦ भारतीय उत्तराधिकार अधिनियम, १९२५ कलम २(f) अन्वये, "प्रोबेट" म्हणजे अधिकारक्षेत्र असलेल्या सक्षम न्यायालयाच्या मुद्रेसह दिलेली मृत्युपत्राची प्रमाणित केलेली प्रत.

("probate" means the copy of a will certified under the seal of a court of competent jurisdiction.) म्हणजेच सक्षम न्यायालयाने संबंधित मृत्युपत्र हे अस्सल आहे आणि कायदेशीरपणे अंमलात आणलेले आहे अशी पुष्टी देणे. प्रोबेट प्रमाणपत्र सर्वांवर बंधनकारक असते.

♦ प्रोबेटसाठी वकीलांच्या मदतीने, ज्या उच्च न्यायालयाच्या अधिकार क्षेत्रात मालमत्ता स्थित असेल, त्या उच्च न्यायालयात अर्ज करावा लागतो. काही ठिकाणी कमी किंमतीच्या स्थावर मालमत्तेसाठी प्रोबेटचे अधिकार कनिष्ठ न्यायालयांना प्रदान करण्यात आले आहेत तथापि, उच्च किमतीच्या स्थावर

Dr. SANJAY KUNDETKAR, Dy. Collector

मालमत्तेसाठी प्रोबेटचे अधिकार उच्च न्यायालयांनाच आहेत. प्रोबेटसाठी मालमत्तेच्या किंमतीवर आधारित न्यायलीन शुल्क अदा करणे आवश्यक असते.

♦ ज्या ठिकाणी प्रोबेट कायद्यानेच आवश्यक नाही तिथे त्याची सक्ती करणे (उदा. बँक) चुकीचे आहे. ह्यासाठी बँक अधिकारी संबंधित लोकांकडून फार तर indemnity bond लिहून घेऊ शकतात. जेणेकरून पुढे काही वाद उदभवल्यास बँकांची काही जबाबदारी राहणार नाही.

♦ प्रोबेट प्रकरणात सुरुवातीच्या टप्प्यात न्यायालयामार्फत हितसंबंधितांना नोटिस जारी करण्यात येते. तसेच शासकीय राजपत्रात अशी नोटिस प्रकाशन करण्यात येते तसेच वर्तमानपत्रातही प्रसिध्दी देण्यात येते. कोणाचा आक्षेप प्राप्त झाल्यास नियमित केसची सुनावणी घेऊन निर्णय देण्यात येतो.

♦ प्रोबेट हे "उत्तराधिकार प्रमाणपत्रांपेक्षा" वेगळे आहे. एखाद्या व्यक्तीने मृत्युपत्र करून ठेवले असेल तर त्याबाबत न्यायालयामार्फत 'प्रोबेट' जारी केला जातो.

♦ एखाद्या व्यक्तीने मृत्युपत्र केले नसल्यास त्याच्या कायदेशीर वारसदारांना 'उत्तराधिकार प्रमाणपत्र' मिळविण्यासाठी न्यायालयात अर्ज करावा लागतो.

♦ प्रोबेटसाठी मालमत्तेच्या मुल्यांकनानुसार कोर्ट फी भरावी लागते. महाराष्ट्र राज्यात, सध्या ती मालमत्तेच्या किंमतीच्या २% ते ७.५०% परंतु जास्तीत जास्त
₹. ७५,०००आहे.

♦ प्रोबेट हे फक्त मृत्युपत्रामधे नमूद केलेल्या व्यक्तीलाच (व्यवस्थापक किंवा निष्पादक Manager /Executors) मागणीनुसार देता येते. मृत्युपत्र करणाऱ्याचा मृत्यू झाल्यानंतर ७ दिवसानंतरच असा अर्ज करता येतो. मृत्युपत्र करणाऱ्याच्या मृत्यूच्या तारखेपासून तीन वर्षांच्या आत प्रोबेटची याचिका दाखल करणे आवश्यक आहे.

♦ कलम २६३ अन्वये "योग्य" कारणे असतील तर दिलेले प्रोबेट रद्द करता येते. "योग्य" कारणांमध्ये खोटी माहिती देणे, कोर्टाची फसवणूक करणे, मालमत्तेची माहिती लपविणे किंवा प्रोबेटची अंमलबजावणी अशक्य किंवा निरुपयोगी झाली आहे इत्यादींचा समावेश होतो. त्याचप्रमाणे प्रोबेट अर्ज चालू असताना जर का कोणी त्यास हरकत घेतली, तर मात्र प्रोबेट अर्ज हा "दिवाणी दाव्यासारखाच" चालविला जातो. मात्र प्रोबेट कोर्टाला "मालकी हक्क" ठरविण्याचा अधिकार नसतो. म्हणजेच मृत्युपत्र कायद्याच्या तरतुदीनुसार झाले कि नाही एवढेच प्रोबेट कोर्ट ठरवू शकते, मृत्युपत्र करणाऱ्याला मिळकती मृत्युपत्राने देण्याचा अधिकार होता कि नाही, हे प्रोबेट कोर्ट ठरवू शकत नाही.

♦ प्रोबेट केवळ मृत्युपत्राची सत्यता ठरवते. ती संपत्ती मृत व्यक्तीची आहे की नाही, त्याला ती लोकांना वाटप करण्याचा अधिकार आहे की याचा प्रोबेटशी काहीही संबंध नाही.

मृत्युपत्राच्या प्रोबेटची प्रक्रिया खालीलप्रमाणे असते.

♦ मृत्युपत्राचे प्रोबेट हे उच्च न्यायालयाच्या शिक्क्यासह मृत्युपत्राची प्रत संलग्न करून दिले जाते. (With the seal of High Court and a copy of the Will attached)

Dr. SANJAY KUNDETKAR, Dy. Collector

♦ प्रोबेटची मागणी करणाऱ्या मृत्युपत्राच्या व्यवस्थापकाला, याचिकाकर्ता म्हणून सक्षम उच्च न्यायालयात, मृत्युपत्रात नमुद मालमत्तेच्या किंमतीनुसार लागू असलेले न्यायालयीन शुल्क अदा केल्यानंतर याचिका (petition) दाखल करणे आवश्यक असते.

♦ त्यानंतर, न्यायालय सामान्यत: याचिकाकर्त्यास मृत्युपत्र करणाऱ्या व्यक्तीच्या मृत्युचा पुरावा आणि दाखल केलेले मृत्युपत्र, मृत्युपत्र करणाऱ्या व्यक्तीने कायदेशीर रित्या केलेले आहे तसेच दाखल मृत्युपत्र हे मृत्युपत्र करून देणाऱ्या व्यक्तीचे अंतिम/शेवटचे मृत्युपत्र आहे याबाबत पुरावे दाखल करण्याचा आदेश देते.

♦ वरील पूर्तता करून प्रोबेटसाठी याचिका प्राप्त झाल्यानंतर, न्यायाधीश, मयत व्यक्तीच्या हितसंबंधीत नातेवाईकांना प्रोबेट देण्यासंदर्भात हरकती नोंदविण्यास नोटीस बजावते आणि सर्वसाधारण लोकांना याबाबत सूचित करण्यासाठी अशी नोटीस जाहीररित्या प्रसिध्द केली जाते.

♦ जर मुदतीत काही आक्षेप प्राप्त झाला नाही आणि जर मृताच्या नातेवाईकांनी प्रोबेट देण्यासंदर्भात त्यांची संमती नोंदविली तर न्यायालय प्रोबेटला मंजूर देते.
तथापि, जर मृत व्यक्तीच्या नातेवाइकांनी प्रोबेटच्या मंजुरीबाबत आक्षेप/हरकत नोंदविली तर त्यांना या प्रकरणात पुरावे देण्यास सक्षम बनविण्यासाठी प्रोबेट याचिका ही मृत्युपत्र खटला (testamentary suit) मध्ये रूपांतरीत होते.

♦ एखाद्या मृत्युपत्राला आव्हान देणे हे कठीण काम असू शकते. बहुतेक प्रकरणांमध्ये, न्यायालय मृत्युपत्राबाबत कडक भुमिका घेते आणि त्यातील मजकूर ग्राह्य मानते कारण मृत्युपत्र करणारा आपला बचावासाठी हजर नसतो. मृत्युपत्र पूर्णतः किंवा अंशतः अवैध/खोटे/बोगस आहे याबाबत जर प्रतिपक्ष न्यायालयाची खात्री पटविण्यात यशस्वी ठरला तर मृत्युपत्र निरर्थक आहे असा आदेश न्यायालय देऊ शकते.

♦ मृत्युपत्राला आव्हान देणाची तरतुद गुंतागुंतीची आहे, शिवाय प्रत्येक प्रकरणातील तथ्य भिन्न असते.

♦ प्रोबेटच्या आव्हानासाठी, 'मर्यादेच्या कायद्याचे' देखील पालन केले जाते, अमर्याद विलंबानंतर दाखल दावा फेटाळला जाऊ शकतो.

♦ 'प्रोबेट ऑफ विल' मिळविणे हे वेळखाऊ काम आहे, ज्यासाठी, मृत्युपत्रान्वये देण्यात आलेल्या मालमत्तेच्या किंमतीनुसार न्यायालयीन कोर्ट फी भरावी लागते. त्यासाठी वेळ आणि पैसा खर्च करावा लागतो

◆ **पूर्वीची तरतूद:** भारतीय उत्तराधिकार अधिनियम, १९२५, पूर्वीचे कलम २१३:
पूर्वीच्या कलम २१३ मध्ये अशी तरतूद होती की, जोपर्यंत भारतातील सक्षम अधिकार क्षेत्राच्या न्यायालयाने, ज्या मृत्युपत्रातंर्गत हक्काचा दावा केला आहे, त्या मृत्युपत्राला प्रोबेट (न्यायालयीन पडताळणी) दिलेले नाही, किंवा मृत्युपत्रासोबत किंवा मृत्युपत्राच्या प्रमाणित प्रतीच्या प्रतीसह प्रशासनाधिकार पत्र (लेटर्स ऑफ ॲडमिनिस्ट्रेशन) दिलेले नाही, तोपर्यंत कोणत्याही न्यायालयात कार्यकारी (एक्झिक्युटर) किंवा वारसदार (लेगेटी) म्हणून कोणताही हक्क प्रस्थापित केला जाऊ शकत नाही.

Dr. SANJAY KUNDETKAR, Dy. Collector

◆ **प्रोबेटची ही अट खालील प्रकरणांमध्ये लागू होती:**

१. कलम ५७ च्या खंड (अ) आणि (ब) अंतर्गत येणाऱ्या कोणत्याही हिंदू, बौद्ध, शीख आणि जैन धर्मिय व्यक्तींनी केलेली मृत्युपत्रे.

२. भारतीय उत्तराधिकार अधिनियम (सुधारणा) कायदा, १९६२ लागू झाल्यानंतर पारशी धर्मिय व्यक्तींनी केलेली मृत्युपत्रे.

३. कलकत्ता, मद्रास आणि मुंबई येथील उच्च न्यायालयांच्या सामान्य-मूळ दिवाणी अधिकार क्षेत्राच्या स्थानिक मर्यादेत केलेली मृत्युपत्रे.

४. कलकत्ता, मद्रास आणि मुंबईच्या हद्दीबाहेर केलेली मृत्युपत्रे, परंतु ती हद्दीत असलेल्या स्थावर मालमत्तेशी संबंधित अतील तर.

तथापि, सदर अट मुस्लिम आणि ख्रिश्चनांनी धर्मिय व्यक्तींनी केलेल्या मृत्युपत्रांना लागू नव्हती.

◆ **प्रोबेटची अनिवार्यता रद्द:** निरसन आणि सुधारणा अधिनियम, २०२५ (अधिनियम क्रमांक ३७, २०२५) याला दिनांक २०.१२.२०२५ रोजी राष्ट्रपतींची संमती मिळाली आणि अखेरीस २१.१२.२०२५ रोजी भारताच्या राजपत्रात प्रसिद्ध झाल्यावर तो अंमलात आला.

सदर सुधारणेने सन १८८६ ते २०२३ या काळातील ७१ कालबाह्य आणि अनावश्यक कायदे, जे आता कायद्याच्या संबंधित राहिलेले नाहीत, ते काढून टाकले.

विशेषतः या अधिनियमाने **भारतीय उत्तराधिकार अधिनियम, १९२५ चे कलम २१३ रद्द केले**. या सुधारणेमुळे मृत्युपत्रातंर्गत हक्क प्रस्थापित करण्यासाठी आवश्यक असलेल्या प्रोबेटच्या अनिवार्यतेसंबंधीच्या कायदेशीर स्थितीत लक्षणीय बदल झाला आहे.

◆ **कलम २१३ रद्द - सद्यस्थिती**

भारतात, मृत्युपत्र वैध ठरण्यासाठी नोटरी, मुद्रांक किंवा नोंदणीचीही आवश्यकता नाही. तथापि, काही विशिष्ट प्रकरणांमध्ये आणि काही विशिष्ट अधिकारक्षेत्रांमध्ये, मृत्युपत्राला वैधता आणि अंतिम स्वरूप देण्यासाठी न्यायालयीन पुष्टीकरणाच्या स्वरूपात प्रोबेटची मंजुरी आवश्यक होती.

आता, २१.१२.२०२५ रोजी निरसन आणि सुधारणा कायदा, २०२५ लागू झाल्यामुळे, **कलम २१३ पूर्णपणे रद्द करण्यात आले आहे.** पूर्वी कलम २१३ नुसार, प्रोबेट किंवा प्रशासनाचे पत्र हे मयत व्यक्तीच्या मालमत्तेवरील कार्यकारी किंवा प्रशासकाच्या प्रतिनिधिक हक्काचा निर्णायक पुरावा म्हणून काम करत असे. जोपर्यंत प्रोबेट मंजूर होत नव्हते, तोपर्यंत खरा वारस किंवा लाभार्थीसुद्धा आपल्या नावावर मालमत्तेचे कायदेशीर हस्तांतरण मिळवू शकत नव्हता, ज्यामुळे वर्षानुवर्षे असंख्य वारसांना व्यावहारिक अडचणींचा सामना करावा लागत होता.

आता कलम २१३ रद्द केल्यामुळे, केंद्र सरकारने विशिष्ट मृत्युपत्राच्या अंमलबजावणीसाठी प्रोबेटची आवश्यकता असण्याची जुनी, किचकट प्रथा संपुष्टात आणली आहे.

तरीही, कलम २१३ वगळल्याने भारतीय उत्तराधिकार अधिनियम, १९२५ अंतर्गत असलेल्या इतर यंत्रणा रद्द ठरत नाहीत. जरी प्रोबेट अनिवार्य करणारी तरतूद रद्द करण्यात आली असली तरी, प्रोबेट किंवा प्रशासनाधिकार पत्राचे कायदेशीर महत्त्व कायम आहे. कलम २१३ रद्द केल्याने **प्रोबेट केवळ अनिवार्य**

Dr. SANJAY KUNDETKAR, Dy. Collector

गरजेऐवजी ऐच्छिक गरज बनले आहे. त्यामुळे, मृत्युपत्राची सत्यता, वैधता आणि अस्सलपणा सिद्ध करण्यासाठी प्रोबेट हा निर्णायक पुरावा म्हणून कायम आहे. हे देखील लक्षात घेतले पाहिजे की, जिथे एखादी व्यक्ती मृत्युपत्र न करता किंवा कायदेशीर वारसांशिवाय मरण पावते, तिथे प्रशासनाधिकार पत्र पूर्वीप्रमाणेच आवश्यक राहील.

◆ कलम २१३ रद्द करण्याचे फायदे:

प्रोबेटची तरतूद रद्द केल्यामुळे, मृत्युपत्रानुसार वारसांना आणि लाभार्थ्यांना मालमत्तेचे हस्तांतरण अधिक जलद आणि सुरळीतपणे करणे शक्य झाले आहे. यामुळे प्रोबेट मिळवण्यासाठी लागणाऱ्या खर्चाचा भारही कमी होईल. न्यायालयीन प्रक्रियेतील स्वाभाविक विलंब टाळता येईल. यामुळे महसूल अधिकारी आणि सहकारी गृहनिर्माण संस्थांकडून प्रोबेटसाठीचा आग्रह यांसारखे प्रशासकीय अडथळे कमी होतील.

मुस्लिम धर्मिय व्यक्तीच्या मृत्युपत्राबातच्या तरतुदी:

♦ भारतीय उत्तराधिकार कायदा १९२५, कलम ५८ अन्वये हा कायदा मुस्लिम व्यक्तीच्या मृत्युपत्राबाबत (वसियतनामा) लागू होत नाही. मुस्लिम धर्मिय व्यक्तींसाठी मृत्युपत्राबाबतच्या तरतूदी त्यांच्या 'हेदाय' या बाराव्या शतकातील अधिकृत ग्रंथात दिलेल्या आहेत. यासंबंधात दुसरा ग्रंथ 'फतवा आलमगिरी' हा सतराव्या शतकात लिहिण्यात आला. 'शराय-उल-इस्लाम' हा ग्रंथ प्रामुख्याने शिया पंथीय मुस्लिमांसाठी आहे.

♦ मुस्लिम धर्मिय व्यक्तीने केलेल्या मृत्युपत्रावर स्वाक्षरी केली नसेल किंवा त्यावर साक्षीदारांचे साक्षांकन नसले तरी ते मृत्युपत्र वैध मानले जाते.

♦ मुस्लिम कायद्यानुसार पुरूष व्यक्ती १५ वर्षे वयाचा झाल्यावर त्याला सज्ञान समजले जाते. इंडियन मेजॉरिटी एक्ट, १८७५ अन्वये पुरूष व्यक्ती १८ वर्षे वयाचा झाल्यावर त्याला सज्ञान समजतात परंतु जर अशी व्यक्ती अज्ञान असतांना न्यायालयाने त्याच्याबाबत 'पालक' नेमला असेल तर अशी व्यक्ती २१ वर्षे वयाचा झाल्यावर त्याला सज्ञान समजतात.

♦ इंडियन मेजॉरिटी एक्ट, १८७५ हा सर्व धर्मियांना लागू असल्याने मुस्लिम पुरूष व्यक्ती १८ वर्षे वयाचा झाल्यावर सज्ञान समजली जाते. १५ वर्षे वयाची सज्ञानता केवळ विवाह, तलाक. मेहेर यांसाठीच लागू आहे.

♦ मुस्लिम धर्मानुसार त्याच व्यक्तीच्या नावे मृत्युपत्र करता येते जी मृत्युपत्र करणाऱ्या व्यक्तीच्या मृत्युच्यावेळी जीवित असेल. तथापि, मृत्युपत्र करण्याच्यावेळी गर्भात असणाऱ्या शिशूचा जन्म मृत्युपत्र करणाऱ्या व्यक्तीच्या मृत्युनंतर सहा महिन्यात झाला तर त्याच्या नावे केलेले मृत्युपत्र ग्राह्य मानले जाते.

♦ मुस्लिम धर्मिय व्यक्तीला त्याचा दफन खर्च व कर्ज फेडीसाठी आवश्यक रक्कम सोडून, त्याच्या संपत्तीच्या १/३ संपत्तीपुरते मृत्युपत्र कोणत्याही वारसांच्या संमतीशिवाय करता येते. १/३ संपत्तीपेक्षा जास्त संपत्तीचे मृत्युपत्र वारसांच्या संमतीनेच वैध होते.

♦ मुस्लिम कायद्याला अविभक्त कुटुंब, मृत व्यक्ती मागे जीवंत असणारे, वारसा हक्क, जन्मसिध्द हक्क, ज्येष्ठ मुलाचा हक्क अशी तत्वे मान्य नाहीत. एखाद्या व्यक्तीचा मुलगा, त्या व्यक्तीच्या जिवंतपणी मयत झाला तर मयताच्या मुलाला मालमत्तेत कोणताही हक्क नसतो.

DR. SANJAY KUNDETKAR, Dy. Collector

♦ पवित्र कुराणात, सर्व रक्त संबंधी, लग्नामुळे झालेले संबंधी हे जवळचे वारस (शेअरर) मानले जातात. मुस्लिम कायद्यान्वये पवित्र कुराणात ठरवून दिल्याप्रमाणे सर्व वारसांना हिस्सा मिळतो.

♦ मुस्लिम सुन्नी हनफी कायद्यानुसार मुस्लिम व्यक्ती मयत झाल्यानंतर त्याच्या पत्नीला मयत व्यक्तीच्या मालमत्तेतील १/८ ठराविक हिस्सा मिळतो. मयत मुस्लिम व्यक्तीस दोन पत्नी असतील तर प्रत्येक पत्नीला १/१६ हिस्सा मिळतो. मयताला मुले असतील तर मुलाला दोन हिस्से आणि मुलीला एक हिस्सा मिळतो.

♦ मुस्लिम कायद्यान्वये ज्या व्यक्तीने आत्महत्या करण्यासाठी विष प्राशन केले असेल किंवा स्वत:ला जखमी करुन घेतले असेल अशा व्यक्तीला वसियतनामा करण्याचा अधिकार नसतो.

नॉमिनेशन आणि मालकी हक्क:

♦ उच्च न्यायालय, मुंबई येथील न्यायमुर्ती मा. श्री. अभय ओक आणि मा. श्री. सय्यद ह्यांच्या खंडपीठाने एका निकालाच्या निमित्ताने नॉमिनेशन बद्दलच्या वेगवेगळ्या कायद्याबाबद्दल सखोल विवेचन केले आहे. नॉमिनी हा केवळ एक ट्रस्टी असतो आणि नॉमिनेशनमुळे इतर वारसांचे कायदेशीर हक्क हिरावून घेतले जाऊ शकत नाहीत, नॉमिनेशन हा वारसाहक्काचा तिसरा कायदा होऊ शकत नाही असे स्पष्ट प्रतिपादन केले आहे.

सोसायटी आणि नॉमिनेशन:

मूळ सभासद मयत झाल्यावर सोसायटीने फक्त नॉमिनी व्यक्तीच्या नावे केलेल्या शेअर्स हस्तांतरणामुळे इतर वारसांचे जागेमधील मालकी हक्क हिरावले जाऊ शकत नाहीत. सोसायटी रेकॉर्डप्रमाणे संबंधित नॉमिनी व्यक्तीच्या नावे शेअर हस्तांतरित केले की सोसायटीची जबादारी संपुष्टात येते. त्यामुळे ज्या वारसांना जागेवर हक्क सांगायचा आहे त्यांना सक्षम न्यायालयात जाऊन दाद मागावी लागेल. ह्या बाबतीत सोसायटी काही निर्णय देऊ शकत नाही, कारण वारस कोण हे ठरविण्याचा अधिकार सोसायटीला नसून फक्त न्यायालयालाच आहे. *(मा. सर्वोच्च न्यायालय- इंद्राणी विरुद्ध सोसायटी रजिस्ट्रार- पश्चिम बंगाल)* मा. सर्वोच्च न्यायालय तसेच मा. उच्च न्यायालयांनी वेळोवेळी स्पष्टपणे नमूद केले आहे की, नॉमिनेशन हा वारसा हक्काचा तिसरा कायदा होऊ शकत नाही. त्यामुळेच जरी नॉमिनेशन केले असले तरी मालकी हक्क हा मृत्युपत्र किंवा वारसा हक्क कायद्याप्रमाणेच ठरविला जातो.

मृत्युपत्राबाबतचे प्रश्न

♦ मृत्युपत्र हा सार्वजनिक दस्तऐवज आहे काय?

✓ नाही, भारतीय पुरावा कायदा, कलम ७४ अन्वये मृत्युपत्र हा सार्वजनिक दस्तऐवज नाही. मृत्युपत्राची प्रमाणित प्रत प्राथमिक दस्तऐवज असल्याचे मानले जाऊ शकत नाही त्यामुळे मृत्युपत्राची प्रमाणित प्रत पुरावा म्हणून दाखल करून घेता येणार नाही. *(The Will is not a public document under Section 74 of the Act. It can be held that certified copy of the Will is not admissible per se in evidence. It cannot be presumed to be a primary document, which could be adduced in evidence.)*

DR. SANJAY KUNDETKAR, Dy. Collector

♦ मृत्युपत्राची तरतूद कोणत्या कायद्यात आहे?

✓ भारतीय वारसा कायदा १९२५, कलम ५७ ते १९० अन्वये मृत्युपत्राबाबत तरतुदी आहेत.

♦ मृत्युपत्र म्हणजे काय?

✓ एखाद्या व्यक्तीने, त्याच्या मालकीच्या संपत्तीचे वाटप त्याच्या मृत्युनंतर, कसे व्हावे याबाबत लेखी स्वरूपात घोषित केलेली इच्छा म्हणजे मृत्युपत्र.

● भारतीय वारसा कायदा, १९२५, कलम- २ (ह) अन्वये मृत्युपत्र-इच्छापत्राची व्याख्या खालीलप्रमाणे दिलेली आहे.

''मृत्युपत्र म्हणजे मृत्युपत्र करणाऱ्या व्यक्तीने, त्याच्या मृत्युनंतर त्याच्या सर्व प्रकारच्या मालमत्तेची विल्हेवाट कशी लावावी यासंबंधीची कायदेशीरपध्दतीने घोषित केलेली इच्छा होय''

● न्यायालयीन निर्णयानुसार, मृत्युपत्र एक असा दस्तऐवज आहे जो मयत व्यक्तीच्या इरादयाची किंवा इच्छांची अंमलबजावणी करण्यासाठी, त्याच्या मागे जीवंत असलेल्या व्यक्तींना दिला जातो. मृत्युपत्र म्हणजे मयत व्यक्तीची शेवटची इच्छा असते. मयत व्यक्तीचा असा इरादा, त्याच्या इच्छेनुसार अत्यंत आदराने आणि पवित्रतेने अंमलात आणला गेला पाहिजे. मृत्युपत्राकडे सामान्य दस्तऐवजांपेक्षा वेगळा विशिष्ट दस्तऐवज म्हणून बघितले जावे. मृत्युपत्र एक असे घोषणापत्र आहे की ज्याव्दारे मृत्युपत्र करणाऱ्याने त्याच्या मृत्युनंतर करण्यात येणाऱ्या व्यवस्थेची इच्छा व्यक्त केलेली असते.

♦ भारतीय वारसा कायदा, १९२५ कोणाला लागू आहे?

✓ भारतीय वारसा कायदा १९२५, भारतातील हिंदू, ख्रिश्चन, पारशी, अँग्लो इंडियन्स इत्यादिंना लागू होतो. 'हिंदू' या संज्ञेमध्ये बौद्ध, शिख, जैन, ब्राम्होसमाजी, आर्यसमाजी, नंबुद्री, लिंगायत यांचाही समावेश होतो व या सर्वांना हा कायदा अंशत: लागू पडतो.

♦ मुस्लिम धर्मिय लोकांना भारतीय वारसा कायदा, १९२५ लागू आहे काय?

✓ मुस्लिम धर्मिय व्यक्तींना हा कायदा पूर्णपणे लागू पडत नसला तरी प्रोबेट, लेटर्स ऑफ एडमिनिस्ट्रेशन इ. साठी लागू आहे.

जेथे व्यक्तीगत कायद्यानुसार वारसासंबंधी प्रश्न निर्माण होत नाहीत तेथे मृत्युपत्रासाठी भारतीय उत्तराधिकार अधिनियम १९२५, च्या तरतुदी लागू होतात.

मुस्लिम धर्मिय व्यक्तीने मुस्लिम कायदा, शरीयतनुसार आपले मृत्युपत्र केले असेल तरच ते परिणामक्षम मृत्युपत्र ठरते. मुस्लिम व्यक्तीस स्वतःच्या संपत्तीच्या फक्त १/३ हिस्सा अन्य वारसांच्या संमतीशिवाय मृत्युपत्रान्वये देता येतो. यापेक्षा जास्त हिस्सा द्यायचा असल्यास वारसांची संमती आवश्यक असते.

♦ मृत्युपत्र करणे आवश्यक आहे काय?

✓ कायद्यानुसार मृत्युपत्र करणे आवश्यक नाही. एखाद्या व्यक्तीला त्याच्या मालमत्तेचे वाटप सर्व वारसांमध्ये कायदेशीरपणे, कोणत्याही वारसाला न डावलता करायची ईच्छा असेल तर मृत्युपत्र करणे आवश्यक नाही. परंतु, वारसांच्या वाटपात भेदभाव करायचा असेल तर मृत्युपत्र करणे केव्हाही चांगले.

DR. SANJAY KUNDETKAR, Dy. Collector

♦ मृत्युपत्र करण्याचे कारण काय?

✓ एकदा माणूस मयत झाल्यावर त्याचे वारस कसे वागतील हे सांगता येत नाही. मृत्युपत्र केलेले असल्यास वारसांमध्ये आपसात मिळकतीच्या मुद्द्यावरून अशा भांडणे होण्याची शक्यता कमी होऊ शकते. माणूस आयुष्यभर अधिकाधिक संपत्ती मिळवण्याच्या मागे असतो, त्याच्या संपत्तीची त्याच्या अंतिम इच्छेप्रमाणे विभागणी करण्याचे काम मृत्युपत्र करते.

♦ मृत्युपत्र करण्यासाठी काही विहित नमुना आहे काय?

✓ नाही, मृत्युपत्र करण्यासाठी कोणताही निश्चित किंवा विहित असा नमुना कोणत्याही कायद्यात सांगितलेला नाही. साध्या कागदावरही मृत्युपत्र करता येते.

(संदर्भ: वेंकटरामा अय्यर वि. सुंदरमबाळ, ए.आर.आर- १९४० मुंबई- ४०२)

♦ मृत्युपत्राच्या ऐवजी नॉमिनेशन (Nomination) केले तर चालेल काय?

✓ नाही, नामनिर्देशन (Nomination) ही एक प्रशासकीय तरतूद आहे, नामनिर्देशित व्यक्ती (Nominee) ही एक विश्वस्त (Trustee) असते, ती मालमत्तेची कायदेशीर मालक नसते.

मालमत्ता धारकाच्या मृत्युनंतर त्याची मालमत्ता स्वीकारून, ती मालमत्ता मयत व्यक्तीच्या वारसांच्या ताब्यात देणे हे नामनिर्देशित व्यक्ती काम असते.

नॉमिनेशन हा वारसा हक्काचा तिसरा कायदा होऊ शकत नाही असे मुंबई उच्च न्यायालायने अनेक निकालांमधून स्पष्ट केले आहे.

(संदर्भ: शशिकिरण पारेख विरुद्ध राजेश अग्रवाल २०१२ (४) एमएच.एल.जे. ३७०)

♦ मृत्युपत्र स्टँप पेपरवरच केलेले असावे किंवा नोंदणीकृतच असावे असे बंधन आहे काय?

✓ नाही. हा एक फार मोठा गैरसमज आहे. मृत्युपत्र साध्या कागदावरही करता येते.

मृत्युपत्र नोंदणीकृतच असावे असे कोणतेही कायदेशिर बंधन नाही.

नोंदणी अधिनियम १९०८, कलम १८ अन्वये मृत्युपत्राची नोंदणी वैकल्पिक (Optional) आहे.

♦ मृत्युपत्र करतांना काय बाबी अनिवार्य आहेत?

• मृत्युपत्र करणारी व्यक्ती सज्ञान (Adult / Person of legal age) असावी.
• मृत्युपत्रावर, मृत्युपत्र करणाऱ्या व्यक्तीची स्वाक्षरी/अंगठा
• मृत्युपत्र करणाऱ्या व्यक्तीला मृत्युपत्रावर स्वाक्षरी/अंगठा करतांना पाहणारे किमान दोन सज्ञान साक्षीदार.
• मृत्युपत्र करणारी व्यक्ती, शारीरिक आणि मानसिक दृष्ट्या सक्षम आहे असे प्रमाणित करणारे डॉक्टरचे प्रमाणपत्र.

♦ अज्ञान (१८ वर्षाखालील) व्यक्तीने किंवा दिवाळखोर (Bankrupt) व्यक्तीने केलेले मृत्युपत्र अंमलात येऊ शकेल काय?

✓ नाही, अज्ञान व्यक्तीने केलेले मृत्युपत्र अंमलात येऊ शकणार नाही. अशी व्यक्ती, अज्ञान असतानाच मयत झाली तरी असे मृत्युपत्र विधिग्राह्य व प्रभावशाली ठरणार नाही. तसेच दिवाळखोर व्यक्तीने केलेले मृत्युपत्र अंमलात येऊ शकणार नाही.

(संदर्भ: के. विजयरत्नम वि. सुदरसनराव ए. आय.आर. १९२०, मद्रास-२३७)

♦ मृत्युपत्र करणारी व्यक्ती मयत झाल्यानंतर मृत्युपत्राची नोंदणी करता येते काय?

✓ होय. नोंदणी अधिनियम १९०८, कलम ४१(२) अन्वये मृत्युपत्र करणारी व्यक्ती मयत झाल्यानंतर मृत्युपत्राची नोंदणी करता येते. मूळ मृत्युपत्र, मृत्यू दाखला, दोन साक्षीदार, मृत्युपत्राचे लाभार्थी यांचा जबाब यांच्यासह अशी नोंदणी करता येते. मृत्युपत्राबाबतचे भविष्यातील वाद टाळण्यासाठी सामान्यपणे अशी नोंदणी करतात.

♦ मृत्युपत्र करण्यास सक्षम व्यक्ती कोण असतात?

✓ भारतीय वारसा कायदा, १९२५, कलम- ५९ अन्वये,

• मृत्युपत्र करणारी व्यक्ती वयाने सज्ञान असावी तसेच मानसिकदृष्ट्या सुदृढ असावी, ती दिवाळखोर नसावी.

• मुक किंवा बधीर किंवा अंध व्यक्ती, जर त्यांना परिणामांची जाणीव असेल तर, मृत्युपत्र करु शकतात.

• मृत्युपत्र स्वसंपादित संपत्तीबाबत तसेच वंशपरंपरेने मिळालेल्या संपत्तीतील फक्त स्वत:च्या हिश्शाबाबत करता येते.

भारतीय उत्तराधिकार अधिनियम १९२५, कलम १५२ अन्वये, जर मृत्युपत्रामध्ये एखादी विशिष्ट मालमत्ता एखाद्या व्यक्तीला देण्याचे नमूद केले असेल, परंतु मृत्युसमयी ती मालमत्ता मृत्युपत्र करणाऱ्याच्या मालकीची राहिलेली नसेल किंवा तिचे दुसऱ्या प्रकारच्या मालमत्तेत रूपांतर झाले असेल, तर ती मालमत्ता निष्फळ (adeemed) ठरते. म्हणजे त्या विशिष्ट मालमत्तेचा लाभ संबंधित लाभार्थ्यास मिळत नाही.

• हिंदू वारसा कायदा १९५६, कलम ३० अन्वये हिंदू व्यक्तीला एकत्र कुटुंबाच्या मिळकतीमधील स्वत:च्या हिश्शाबाबतच मृत्युपत्र करता येते.

• वेडसर व्यक्ती, जेव्हा वेडाच्या भरात नसेल तेव्हा मृत्युपत्र करु शकते. परंतु वेडाच्या भरात, नशेत, आजारात, शुद्धीवर नसताना, फसवणुकीने, दबावाखाली करण्यात आलेले मृत्युपत्र विधीग्राह्य असणार नाही.

♦ हिंदू स्त्रिया/विधवा यांना मृत्युपत्र करता येते काय?

✓ होय, हिंदू वारसा कायदा १९५६, कलम १४ अन्वये हिंदू वारसा कायदा अंमलात येण्यापूर्वी किंवा त्यानंतर, हिंदू स्त्रिची, तिच्या कब्जात विना अट असलेली कोणतीही संपत्ती, मग अशी मालमत्ता तिला विवाहापूर्वी किंवा नंतर वारसाहक्काने, मृत्युपत्रीय दानाने, वाटणीमध्ये पोटगी म्हणून, नातलगांकडून मिळालेली असो किंवा तिने अशी मालमत्ता स्वत:च्या कौशल्याने, परिश्रमाने किंवा एखादी संपत्ती दान म्हणून, मृत्युपत्रान्वये, इतर कोणत्याही लेखान्वये, दिवाणी न्यायालयाच्या हुकूमनाम्यान्वये, आदेशान्वये किंवा एखाद्या निवाड्यान्वये संपादित केली गेली असेल किंवा अन्य कोणत्याही मार्गाने संपादित केलेली असो, अशी संपत्ती, हिंदू स्त्री, मर्यादित स्वामी म्हणून नव्हे तर संपूर्ण स्वामी (Absolute Owner) म्हणून धारण करते.

अशी हिंदू स्त्री, तीची वरील प्रमाणे असलेली कोणतीही मालमत्ता मृत्युपत्राने देऊ शकते.

DrSANJAY KUNDETKAR, Dy Collector

♦ मृत्युपत्र रद्द करता येते काय किंवा मृत्युपत्रात बदल करता येतो काय?

✓ होय, भारतीय उत्तराधिकार अधिनियम १९२५, कलम- ६२ अन्वये,

मृत्युपत्र करणारी व्यक्ती, त्याने केलेले मृत्युपत्र त्याच्या हयातीत कधीही रद्द करु शकते किंवा त्यात कितीही वेळा बदल किंवा दुरुस्ती करू शकते.

आधीचे मृत्युपत्र रद्द करुन नवीन मृत्युपत्र करतांना, "आधीचे, दिनांक ...रोजी केलेले मृत्युपत्र रद्द समजावे" असा उल्लेख नवीन मृत्युपत्रात असणे अपेक्षीत आहे.

♦ मृत्युपत्रात काय मजकूर असावा?

✓ भारतीय उत्तराधिकार अधिनियम १९२५, कलम- ६३ अन्वये:

• मृत्युपत्रानुसार प्रदान केलेल्या मिळकतीचे पुरेसे आणि निश्चित वर्णन मृत्युपत्रात असावे.

• मृत्युपत्रात उल्लेखित मिळकत मृत्युपत्र करणाऱ्याकडे कशी आली याबाबत स्पष्ट उल्लेख असावा.

• मृत्युनंतर संबंधित मिळकतीची विल्हेवाट कोणी व कशी लावावी याबाबत स्पष्ट उल्लेख असावा.

• कोणत्या वारसाला, कोणती मालमत्ता आणि किती प्रमाणात देण्यात आली आहे याबाबत स्पष्ट उल्लेख असावा.

• मृत्युपत्र करणाऱ्या व्यक्तीने फक्त स्वसंपादित संपत्तीबाबत तसेच वंशपरंपरेने मिळालेल्या संपत्तीतील फक्त स्वत:च्या हिश्शाबाबतच मृत्युपत्र करावे.

• मृत्युपत्रावर किमान दोन किंवा अधिक साक्षीदारांनी, त्यांची नावे, वय, पत्ता व स्वाक्षरीसह, असे मृत्युपत्र साक्षांकीत केलेले असावे. साक्षीदारांनी फक्त मृत्युपत्र साक्षांकित करणे पुरेसे नाही तर ह्या साक्षीदारांनी, मृत्युपत्र करणाऱ्या व्यक्तीला मृत्युपत्रावर स्वाक्षरी करतांना पाहणेही आवश्यक आहे. थोडक्यात मृत्युपत्र करणाऱ्या व्यक्तीने, मृत्युपत्र साक्षांकीत करणाऱ्या साक्षीदारांच्या समक्ष मृत्युपत्रावर स्वाक्षरी करावी.

♦ वारस असणारी व्यक्ती मृत्युपत्रावर साक्षीदार म्हणून स्वाक्षरी करू शकेल काय?

✓ होय, भारतीय उत्तराधिकार अधिनियम १९२५, कलम ६८ अन्वये,

कोणत्याही मृत्युपत्रावर साक्षीदार म्हणून स्वाक्षरी करणाऱ्या व्यक्तीला, त्या मृत्युपत्रात नमूद संपत्तीत हिस्सा मिळत असल्यास किंवा अशा साक्षीदार व्यक्तीला, मृत्युपत्र करणाऱ्या व्यक्तीने मृत्यूपत्राचा व्यवस्थापक (Executor) म्हणून नेमलेले असले तरी तिच्या साक्षीदार असण्यावर परिणाम होत नाही.

♦ मृत्युपत्र करणाऱ्या व्यक्तीच्या हयातीत मृत्युपत्राचा अंमल होऊ शकतो काय?

✓ कधीही नाही, कोणतेही मृत्युपत्र हे मृत्युपत्र करणाऱ्या व्यक्तीच्या मृत्युनंतरच अंमलात येऊ शकते. एखाद्या व्यक्तीने मृत्युपत्र लिहिले तरी ती व्यक्ती जीवंत असेपर्यंत संपत्तीवर त्या व्यक्तीचाच अधिकार राहतो. त्या व्यक्तीच्या मृत्युनंतरच त्याची संपत्ती त्याच्या उत्तराधिकाऱ्याला मिळते.

♦ गर्भस्थ शिशूच्या (Child in womb) नावे मृत्युपत्र करता येईल काय?

✓ होय, हिंदू डिस्पोझिशन्स ऑफ प्रॉपर्टी ऍक्ट, १९१६ च्या तरतुदी अस्तित्वात असल्याने गर्भस्थ शिशूच्या नावे मृत्युपत्र करता येते.

♦ मृत्युपत्राचे किती प्रकार आहेत?

DR. SANJAY KUNDETKAR, DY. Collector

✓ भारतात लागू असलेल्या भारतीय उत्तराधिकार अधिनियम १९२५ अन्वये मृत्युपत्राचे मुख्य दोन प्रकार आहेत:

◆ विशेषाधिकारयुक्त मृत्युपत्र (Privileged Will)

◆ विशेषाधिकार नसलेले मृत्युपत्र (Unprivileged Will)

• विशेषाधिकारयुक्त मृत्युपत्र (Privileged Will) म्हणजे काय?

भारतीय उत्तराधिकार अधिनियम १९२, कलम ६५ अन्वये विशेषाधिकारयुक्त मृत्युपत्राची तरतूद आहे. तर कलम ६६ अन्वये विशेषाधिकारयुक्त मृत्युपत्र (Privileged Will) कसे करता येते आणि त्याची अंमलबजावणी कशी होते, याबद्दलचे नियम सांगते.

• विशेषाधिकारयुक्त मृत्युपत्र, फक्त युद्धात असलेले किंवा विशेष मोहीमेवर असलेले सैनिक, वायुदलाचे वैमानिक, समुद्रात असलेले नाविक यांनाच लागू होते.

• विशेषाधिकारयुक्त मृत्युपत्र लेखी किंवा तोंडी असू शकते.

• जर असे मृत्युपत्र पूर्णपणे स्वतःच्या हस्ताक्षरात लिहिले असेल, तर त्यावर स्वाक्षरी किंवा साक्षीदारांची आवश्यकता नसते.

• जर असे मृत्युपत्र दुसऱ्या व्यक्तीने पूर्ण किंवा अंशतः लिहिले असेल आणि मृत्युपत्र करणाऱ्या व्यक्तीने त्यावर स्वाक्षरी केली असेल, तर साक्षीदारांची आवश्यकता नसते.

• जर असे मृत्युपत्र दुसऱ्याने लिहिलेले असेल आणि त्यावर स्वाक्षरी नसेल, तरी ते त्या व्यक्तीच्या सांगण्यावरून लिहिले गेले किंवा त्याने ते स्वतःचे मृत्युपत्र म्हणून मान्य केले, हे सिद्ध झाल्यास ते वैध ठरू शकते.

• असे मृत्युपत्र पूर्ण होण्यापूर्वीच व्यक्तीचा मृत्यू झाला, पण ते अपूर्ण राहण्याचे कारण मृत्युपत्र करण्याचा विचार सोडून देणे नसले, तर ते केवळ अपूर्ण असल्यामुळे अवैध ठरत नाही.

• जर त्या व्यक्तीने मृत्युपत्र तयार करण्यासाठी लेखी सूचना दिल्या आणि अंतिम मृत्युपत्र तयार होण्यापूर्वी तिचा मृत्यू झाला, तर त्या सूचनांनाच मृत्युपत्र मानले जाऊ शकते.

• जर त्या व्यक्तीने दोन साक्षीदारांसमोर तोंडी सूचना दिल्या आणि त्या तिच्या जीवंतपणी लेखी स्वरूपात उतरवण्यात आल्या, पण अंतिम मृत्युपत्र तयार होण्यापूर्वी त्याचा मृत्यू झाला, तरी त्या सूचनांना मृत्युपत्र म्हणून मान्यता मिळू शकते.

• दोन साक्षीदारांच्या एकाच वेळी उपस्थितीत तोंडी मृत्युपत्र (oral will) देखील करता येते.

• तथापि, असे तोंडी मृत्युपत्र, करणारी व्यक्ती जीवंत राहिली आणि तिला विशेषाधिकारयुक्त मृत्युपत्र करण्याचा अधिकार संपल्यानंतर एक महिना उलटला, तर ते निष्प्रभ (null) होते.

• उक्त सर्व सवलती सामान्य नागरिकांसाठी लागू नाहीत.

◆ **विशेषाधिकार नसलेले मृत्युपत्र (Unprivileged Will)**

(ए) संयुक्त मृत्युपत्र (Joint Will): जेव्हा एकापेक्षा जास्त व्यक्ती, एकाच लेखाने, त्यांच्या मृत्युनंतर, त्यांच्या संपत्तीची विल्हेवाट कशी लावावी याबाबत लेख करतात त्याला संयुक्त मृत्युपत्र म्हणतात. अशा व्यक्तींपैकी ज्याचा मृत्यू होईल, त्या व्यक्तीच्या संपत्तीबद्दल मृत्युपत्रातील भाग प्रभावित होईल.

Dr SANJAY KUNDETKAR, Dy. Collector

(बी) पारस्परिक मृत्युपत्र (Mutual Will): जेव्हा दोन व्यक्ती, एकाचा मृत्यू झाल्यावर दुसऱ्याला त्याची संपत्ती मिळेल या आशयाचा लेख करतात त्याला पारस्परिक मृत्युपत्र म्हणतात. (उदा. पती-पत्नी)
(सी) स्वलिखित मृत्युपत्र (Holographic Will): पूर्णत: स्वहस्ताक्षरात लिहिलेल्या मृत्युपत्राला स्वलिखित मृत्युपत्र म्हणतात.
(डी) नोंदणीकृत मृत्युपत्र (Registered Will): नोंदणी कायदा, १९०८, कलम १७ अन्वये नोंदणी केलेल्या मृत्युपत्राला नोंदणीकृत मृत्युपत्र म्हणतात. मृत्युपत्राची नोंदणी करता येते, रुपये पाचशेच्या स्टँप पेपरवर मृत्युपत्र नोंदणीकृत केलेले असल्यास पुढे कायदेशीर अडचणी उद्भवत नाहीत. तथापि, नोंदणी कायदा, १९०८, कलम १८ अन्वये मृत्युपत्र नोंदणीकृत असणे आवश्यक नाही.
(इ) जमा केलेले मृत्युपत्र (Deposited Will): मृत्युपत्र, पाकीटात बंद/सील करुन दुय्यम निबंधकाकडे जमा करता येते. याला जमा केलेले मृत्युपत्र म्हणतात.

♦ नोंदणी कायद्यातील तरतूद: कोणताही मृत्युपत्रकर्ता, त्याचे मृत्युपत्र, मोहोरबंद लिफाफ्यामध्ये, त्यावर मृत्युपत्र करणाऱ्याचे आणि त्याच्या प्रतिनिधीचे नाव लिहून, दस्तऐवजाच्या स्वरूपात निवेदनासह एक तर स्वतः किंवा त्याच्या प्राधिकृत अभिकर्त्यामार्फत मृत्युपत्र निबंधकाकडे जमा करू शकेल (नोंदणी कायदा १९०८, कलम ४२)

♦ असा लिफाफा प्राप्त झाल्यावर, निबंधक असे मृत्युपत्र जमा करण्यासाठी सादर करणारी व्यक्ती ही, मृत्युपत्रकर्ता किंवा त्याचा अभिकर्ता आहे अशी खात्री पटल्यास, तो आपल्या नोंदणी पुस्तक क्रमांक- ५ मध्ये उपरोक्त पत्ता लिहून घेईल आणि त्याच नोंदणी पुस्तकामध्ये व उक्त लिफाफ्यावर ते सादर केल्याचे व प्राप्त झाल्याचे वर्ष, महिना, दिवस व वेळ आणि जो मृत्युपत्रकर्त्याची किंवा त्याच्या अभिकर्त्याची ओळख पटवून घेईल आणि त्यांची नावे आणि मोहरबंद लिफाफ्यावर लिहून ठेवील. त्यानंतर निबंधक, मोहरबंद लिफाफा आपल्या आगप्रतिबंधक पेटीमध्ये जतन करून ठेवील. (नोंदणी कायदा १९०८, कलम ४३)

♦ ज्याने कलम ४२ अन्वये, मोहोरबंद लिफाफा निक्षेपित केला आहे अशा मृत्युपत्र कर्ताचा मृत्यू झाल्यास, ज्या निबंधकाकडे मृत्युपत्र जमा केले होते त्याच्याकडे मृत्युपत्राचा मोहोरबंद लिफाफा उघडण्यासाठी अर्ज करता येईल आणि मृत्युपत्रकर्ता मयत झाला आहे अशी निबंधकाची खात्री पटल्यानंतर, तो अर्जदाराच्या उपस्थितीत मृत्युपत्राचा मोहोरबंद लिफाफा उघडेल आणि अर्जदाराच्या खर्चाने त्यात अंतर्भूत असलेल्या मृत्युपत्राच्या नकला, त्याच्याकडील पुस्तक क्रमांक ३ मध्ये लावून ठेवील. अशी नक्कल करण्यात येईल तेव्हा निबंधक मूळ मृत्युपत्र अर्जदाराकडे देईल. (नोंदणी कायदा १९०८, कलम ४५)
(एफ) सशर्त मृत्युपत्र (Conditional or Contingent Will) – एखादी विशिष्ट अट पूर्ण झाल्यानंतरच लागू होणारे मृत्युपत्र.

♦ एकाच व्यक्तीने, एकापेक्षा जास्त मृत्युपत्र केले असतील तर कोणते मृत्युपत्र ग्राह्य असेल?

✓ भारतीय उत्तराधिकार अधिनियम १९२५, कलम ६२ आणि कलम ७० यांचा एकत्रित विचार करता, एकाच व्यक्तीने, एकापेक्षा जास्त मृत्युपत्र केले असतील तर त्याने सर्वात शेवटच्या दिनांकास केलेले मृत्युपत्र ग्राह्य मानले जाते.

♦ मृत्युपत्रात लेखन प्रमाद असेल तर काय करावे?

✓ भारतीय उत्तराधिकार अधिनियम १९२५, कलम ७६ अन्वये,

Dr. SANJAY KUNDETKAR, Dy. Collector

मृत्युपत्रातील नाव, मालमत्तेचा क्रमांक इत्यादींबाबतचा लेखन प्रमाद, त्याचा नेमका अर्थ लक्षात येत असेल तर दुर्लक्षित करण्यात यावा.

♦ मृत्युपत्रात विसंगत प्रदाने असतील तर काय करावे?

✓ भारतीय उत्तराधिकार अधिनियम १९२५, कलम ८८ अन्वये,

जर एखाद्या मृत्युपत्रात नमूद दोन कलमात नमूद इच्छा किंवा दाने विसंगत असतील आणि त्या दोन्ही इच्छा एकत्रपणे पूर्ण करणे शक्य नसेल तर शेवटी नमूद इच्छा विधिग्राह्य ठरेल.

● *उदाहरण १.* एका मृत्युपत्र करणाऱ्या व्यक्तीने, त्याच्या मृत्युपत्रातील पहिल्या कलमामध्ये, त्याची 'क्ष' ठिकाणी असणारी मालमत्ता 'अ' ला द्यावी असे नमूद केले आणि त्याच मृत्युपत्रात, दुसऱ्या कलमामध्ये, त्याची 'क्ष' ठिकाणी असणारी मालमत्ता 'ब' ला द्यावी असे नमूद केले.

एकच मालमत्ता एकत्रपणे दोघांना देणे शक्य नसल्याने ही दोन्ही कलमे विसंगत ठरतात व शेवटचे कलम विधिग्राह्य ठरुन अशी मालमत्ता 'ब' ला मिळेल.

● *उदाहरण २.* एका मृत्युपत्र करणाऱ्या व्यक्तीने, त्याच्या मृत्युपत्रातील पहिल्या कलमामध्ये, त्याचे 'क्ष' ठिकाणी असणारे घर 'अ' ला द्यावे असे नमूद केले आणि त्याच मृत्युपत्रात, शेवटच्या कलमामध्ये असे नमूद केले की, त्याचे 'क्ष' ठिकाणी असणारे घर विकून टाकावे आणि येणाऱ्या रक्कमेचा विनियोग 'ब' साठी करण्यात यावा.

एकच घर 'अ' ला देणे आणि तेच घर विकून येणाऱ्या रक्कमेचा विनियोग 'ब' साठी करणे या दोन्ही गोष्टी एकत्र करणे शक्य नसल्याने ही दोन्ही कलमे विसंगत ठरतात व शेवटचे कलम विधिग्राह्य ठरुन घर विकून येणाऱ्या रक्कमेचा विनियोग 'ब' साठी करणे विधिग्राह्य ठरेल.

मृत्युपत्रात उल्लेखिलेल्या संपत्तीपैकी मृत्युपत्र करणाऱ्याच्या निधनाच्या वेळेस शिल्लक संपत्तीच केवळ विचारात घेतली जाते.

♦ कोडिसिल (Codicil) म्हणजे काय?

✓ भारतीय उत्तराधिकार अधिनियम १९२५, कलम ७० अन्वये,

कोडिसिल हा एक कायदेशीर दस्तऐवज (पुरवणीपत्र- Supplementary Sheet) आहे जो मूळ मृत्युपत्राला जोडला जातो.

संपूर्ण मृत्युपत्र नव्याने न लिहिता, मूळ मृत्युपत्रात किरकोळ बदल (minor changes) करणे, नवीन तरतुदी जोडणे किंवा एखादा भाग वगळण्यासाठी याचा वापर केला जातो.

वारसदार (Beneficiary) बदलणे, मृत्युपत्राची अंमलबजावणी करणारी व्यक्ती (Executor) बदलणे किंवा विशिष्ट मालमत्तेचे वाटप नव्याने ठरवणे यासाठी कोडिसिलचा वापर होतो.]

कोडिसिलला मूळ मृत्युपत्राप्रमाणेच कायदेशीर मान्यता असते.

कोडिसिल वैध ठरण्यासाठी त्यावर मृत्युपत्रकर्त्याची स्वाक्षरी आणि साक्षीदारांच्या स्वाक्षऱ्या असणे आवश्यक आहे. कोडिसिलचा दस्त मृत्युपत्राचा एक भाग मानला जातो.

♦ मृत्युपत्र खोटे आहे हे सिद्ध करण्याची जबाबदारी कोणाची असते?

Dr. SANJAY KUNDETKAR, Dy. Collector

✓ मृत्युपत्र खरे नाही, ते खोटे आहे हे सिद्ध करण्याची जबाबदारी जो तसा अरोप करतो त्याची आहे.
(संदर्भ: चंद्रकांत मेढी वि. लखेश्वरनाथ ए.आय.आर- १९७६ गोहत्ती पान -९८)

♦ मुस्लिम धर्मिय व्यक्तीच्या मृत्युपत्राबातच्या काय तरतुदी आहेत?

✓ भारतीय उत्तराधिकार कायदा १९२५, कलम ५८ अन्वये हा कायदा मुस्लिम धर्मिय व्यक्तीच्या मृत्युपत्राबाबत (वसियतनामा) लागू होत नाही.

मुस्लिम धर्मिय व्यक्तींसाठी मृत्युपत्राबाबतच्या तरतुदी त्यांच्या 'हेदाय' या बाराव्या शतकातील अधिकृत ग्रंथात दिलेल्या आहेत. यासंबंधात दुसरा ग्रंथ 'फतवा आलमगिरी' हा सतराव्या शतकात लिहिण्यात आला. 'शराय-उल-इस्लाम' हा ग्रंथ प्रामुख्याने शिया पंथीय मुस्लिमांसाठी आहे. मुस्लिम कायद्यानुसार पुरूष व महिला दोघेही मृत्युपत्र करू शकतात. परदानशिन महिलांच्या मृत्युपत्राची सत्यता सिद्ध करण्यासाठी सबळ पुरावा आवश्यक आहे.

◆ *स्वाक्षरी:* मुस्लिम कायद्यानुसार (Islamic Personal Law), वसीयत (will) ही अत्यंत अनौपचारिक (informal) पद्धतीनेही वैध ठरू शकते. म्हणजे:
• वसियत लिखित असणे अनिवार्य नाही, तोंडी वसीयतही वैध ठरू शकते.
• स्वाक्षरी (signature) आणि साक्षीदार (witnesses) या कठोर कायदेशीर अट नाहीत.
• मुख्य मुद्दा म्हणजे मयत व्यक्तीची स्पष्ट इच्छा (intention) सिद्ध होणे.

तरीही महत्त्वाची गोष्ट अशी आहे की, स्वाक्षरी नसणे किंवा साक्षीदार नसणे म्हणजे वसीयत आपोआप वैध ठरते असे नाही. वसीयत वैध ठरण्यासाठी न्यायालयात तिची खरी आणि स्वेच्छेने केलेली असल्याचे पुरावे आवश्यक असतात.
मुस्लिम कायद्यात औपचारिकता (Formality) कमी असते, पण "पुरावा" (proof) खूप महत्त्वाचा असतो. मुस्लिम धर्मिय व्यक्तीने केलेल्या मृत्युपत्रावर स्वाक्षरी केली नसेल किंवा त्यावर साक्षीदारांचे साक्षांकन नसले तरी ते मृत्युपत्र वैध मानले जाते.

◆ *सज्ञानता:* मुस्लिम कायद्यानुसार पुरूष व्यक्ती १५ वर्षे वयाचा झाल्यावर त्याला केवळ विवाह, तलाक. मेहेर सज्ञान समजले जाते. इंडियन मेजॉरिटी ऍक्ट, १८७५ अन्वये पुरूष व्यक्ती १८ वर्षे वयाचा झाल्यावर त्याला सज्ञान समजतात परंतु जर अशी व्यक्ती अज्ञान असतांना न्यायालयाने त्याच्याबाबत 'पालक' नेमला असेल तर अशी व्यक्ती २१ वर्षे वयाचा झाल्यावर त्याला सज्ञान समजतात.
इंडियन मेजॉरिटी ऍक्ट, १८७५ हा सर्व धर्मियांना लागू असल्याने मुस्लिम पुरूष व्यक्ती १८ वर्षे वयाचा झाल्यावर सज्ञान समजली जाते

◆ *गर्भस्थ शिशू:* सामान्यतः वसीयत त्या व्यक्तीसाठी वैध मानली जाते जी वसीयत करणाऱ्या व्यक्तीच्या मृत्यूसमयी जीवंत असेल. म्हणजेच मृत्युनंतर जीवंत असलेली व्यक्तीच वारसा/वसीयतचा लाभ घेऊ शकते. परंतु एक महत्त्वाचा अपवाद गर्भातील शिशू बाबत आहे:

DR. SANJAY KUNDETKAR, Dy. Collector

• जर वसीयत करताना मूल आईच्या गर्भात असेल, आणि त्या मुलाचा जन्म वसीयत करणाऱ्या व्यक्तीच्या मृत्युनंतर सहा महिन्यांच्या आत (किंवा कायदेशीररित्या मान्य कालावधीत जीवंत जन्म) झाला, तर त्या मुलाला कायदेशीर "जीवंत" मानून त्याच्या नावाची वसीयत वैध ठरते.

◆ *मर्ज-उल-मौत ((death-bed gift):* मर्ज-उल-मौत हे मुस्लिम कायद्यानुसार मृत्युशय्येवर दिले जाणारे दान आहे, जे मृत्युचा धोका असलेल्या गंभीर आजाराच्या वेळी दिले जाते. यासाठी मृत्युची मानसिक भीती, सामान्य कामे करण्याची असमर्थता आणि आजारानंतर मृत्यू येणे आवश्यक आहे.
मुस्लिम धर्मिय व्यक्तीला त्याचा दफन खर्च व कर्ज फेडीसाठी आवश्यक रक्कम वेगळी ठेऊन स्वत:च्या जंगम आणि स्थावर दोन्ही मालमत्तेचा फक्त १/३ भाग कोणत्याही वारसांच्या संमतीशिवाय या पध्दतीत दान दिला जाऊ शकतो. १/३ संपत्तीपेक्षा जास्त संपत्तीचे मृत्युपत्र/दान सर्व वारसांच्या संमतीनेच वैध होते. जर दाता आजारातून बरा झाला, तर मर्ज-उल-मौत अंतर्गत दिलेले दान अवैध ठरते.

◆ *प्रोबेट:* भारतीय उत्तराधिकार अधिनियम १९२५, कलम २१३ मुस्लिम व्यक्तीला लागू होत नाही. त्यामुळे त्यांना प्रोबेट घेणे कायदेशीरदृष्ट्या अनिवार्य नाही परंतु प्रोबेट घेणे अनिवार्य नाही याचा अर्थ असा नाही की, वसियत आपोआप सिद्ध मानली जाते, वाद झाल्यास वसियतचा खरेपणा पुरावा, साक्षीदार, इत्यादींसह सिद्ध करावा लागतो.

♦ व्यवस्थापन पत्र (Letter of Administration) म्हणजे काय?

✓ जेव्हा एखादी व्यक्ती मृत्युपत्र न करता मृत्यू पावते, आणि आणि तिच्या मालमत्तेचे व्यवस्थापन करण्यासाठी कायदेशीर वारसांपैकी कोणीही सक्षम किंवा नियुक्त नसतो, तेव्हा न्यायालयाकडून Letter of Administration दिले जाते.
न्यायालय एका योग्य व्यक्तीला अधिकृतपणे मालमत्ता सांभाळण्याचा व वाटप करण्याचा अधिकार देते. त्या अधिकृत परवान्याला Letter of Administration म्हणतात.

♦ प्रतिबंधित सत्ता प्रकारच्या मालमत्तेचे मृत्युपत्र करता येईल काय?

✓ एखादी जीवंत व्यक्ती कोणत्याही कायद्याचे उल्लंघन करून एखादा दस्तऐवज निष्पादित (तयार) करू शकत नाही, जर कायद्याने परवानगी दिली नसेल किंवा जर एखादी विशिष्ट गोष्ट करण्यास मनाई असेल, अथवा एखादे विशिष्ट कृत्य केवळ एका ठराविक पद्धतीनेच करण्यास परवानगी असून इतर प्रकारे करण्यास मनाई असेल, तर कायद्याच्या अशा तरतुदीचे उल्लंघन करणारे कोणतेही दस्तऐवज, करार किंवा कोणतीही कृती ही बेकायदेशीर आणि अवैध ठरतात.
तसेच अशा प्रतिबंधित तरतुदींचे उल्लंघन करून, कोणतीही व्यक्ती अशा मालमत्तेबाबत आपली इच्छा किंवा उद्देश दर्शवणारे कोणतेही दस्तऐवज (मृत्युपत्रासह) निष्पादित करू शकत नाही.

उदाहरणार्थ:

◆ एखादी आदिवासी व्यक्ती आपल्या भोगवटा हक्काचे हस्तांतरण एखाद्या अन्य आदिवासी व्यक्तीला किंवा बिगर-आदिवासी व्यक्तीला मृत्युपत्राव्दारे करू शकत नाही.

DR. SANJAY KUNDETKAR, Dy. Collector

◆ शेतजमिनीचा मालक झालेला कूळ, 'महाराष्ट्र कुळवहिवाट कायद्या'च्या कलम ४३ चे उल्लंघन करून मृत्युपत्र निष्पादित करू शकत नाही.

◆ एखादा शेतकरी, बिगर-शेतकरी व्यक्तीच्या नावे मृत्युपत्र निष्पादित करू शकत नाही.

असे मृत्युपत्र, कायद्याचे उल्लंघन करणारे असल्यामुळे ते अवैध ठरतो आणि त्याकडे दुर्लक्ष केले जाऊ शकते.

(संदर्भ: मा. सर्वोच्च न्यायालय, विनोदचंद्र साकरलाल कपाडिया विरुद्ध गुजरात राज्य, दि. १५ जून २०२०)

♦ मृत्युपत्रात नमूद मालमत्तेच्या मालकी हक्काबाबत कोणताही वाद असल्यास:

✓ कायद्याच्या प्रस्थापित तत्त्वानुसार, जर मालकी हक्काबाबत कोणताही वाद असेल—आणि विशेषतः जेव्हा मृत्युपत्राच्या आधारे फेरफार नोंद (Mutation Entry) घेण्याचा प्रयत्न केला जात असेल—तेव्हा मृत्युपत्राच्या आधारे मालकी हक्क किंवा अधिकार सांगणाऱ्या संबंधित पक्षकाराने योग्य त्या दिवाणी न्यायालयात जाऊन आपले अधिकार निश्चित करून घेणे आवश्यक असते; आणि केवळ त्यानंतरच, दिवाणी न्यायालयाच्या निर्णयाच्या आधारे, आवश्यक ती फेरफार नोंद घेता येते.

(संदर्भ: मा. सर्वोच्च न्यायालय, विशेष अनुमती याचिका (दिवाणी) क्र. १३१४६/२०२१
जितेंद्र सिंग विरुद्ध मध्य प्रदेश राज्य व इतर. दि. ६ सप्टेंबर २०२१)

♦ मृत्युपत्राची महसूल अभिलेखात (गाव दप्तरी) नोंद:

• ग्राम महसूल अधिकारी यांनी मृत्युपत्र सादर करणाऱ्या अर्जदाराकडून मूळ मृत्युपत्र, मूळ/ साक्षाकीत मृत्यू दाखला, मयत व्यक्तीला असणाऱ्या इतर वारसदारांची माहिती इत्यादि सर्वसाधारण वारस नोंदीसाठी आवश्यक असणारी कागदपत्रे घ्यावीत.

• सर्वसाधारणपणे महसूल अभिलेखात वारस नोंद करतांना प्रथम गाव नमुना ६-क (वारस नोंदवही) ला वारस अर्जानुसार नोंद केली जाते. वारसांबाबत स्थानिक चौकशी करून वारस ठराव मंजूर केला जातो व नंतर गाव नमुना ६ (फेरफार नोंदवही) ला ते वारस नोंदवून पुढील प्रक्रिया पार पाडली जाते. किंवा गाव नमुना ६-क आणि गाव नमुना ६ ला एकाच वेळी नोंद नोंदविली जाते आणि पुढील प्रक्रिया पार पाडली जाते.

परंतु, मयत खातेदाराने मृत्युपत्र केले असल्यास, वारस नोंद गाव नमुना ६-क ला नोंदविण्याची आवश्यकता नाही. कारण मयत खातेदाराला कोण कोण वारस आहेत याची चौकशी करून योग्य वारस अभिलेख सदरी नोंदविणे हा गाव नमुना ६-क ला नोंद घेण्याचा उद्देश असतो. मयत खातेदार ज्यावेळेस, त्याच्या मृत्युपत्राव्दारे स्वत:चे वारस कोण असतील हे ठरवून ठेवतो तेव्हा पुन्हा वारसांची चौकशी करण्याचे कारण नाही. मृत्युपत्रान्वये असलेल्या वारसांची नोंद थेट गाव नमुना ६ (फेरफार नोंदवही) ला नोंदविण्यात यावी.

• सर्व हितसंबंधितांना नोटिस बजवावी.

• मुदतीनंतर कोणाचाही आक्षेप नसेल तर मंडल अधिकाऱ्याकडे पुढील कार्यवाहीसाठी सादर करावी.

▶ मंडल अधिकारी यांनी, कोणाचाही आक्षेप नसेल अशा मृत्युपत्राबाबत खालील बाबी तपासाव्या:

• सर्व हितसंबंधितांना नोटिस बजावली गेली आहे काय?

Dr. SANJAY KUNDETKAR, Dy. Collector

• मृत्युपत्रावर, मृत्युपत्र करणाऱ्या व्यक्तीने, मृत्युपत्र त्याने स्वत: केले आहे हे दर्शविण्याची निशाणी म्हणून त्यावर किमान दोन किंवा अधिक साक्षीदारांसमक्ष स्वाक्षरी किंवा अंगठा किंवा इतर निशाणी केली आहे काय?

• स्वाक्षरी म्हणून अंगठ्याचा ठसा असल्यास, तो महसूल नियम पुस्तिका, खंड ४, अ. क्र. २७ वर निर्देशित केल्याप्रमाणे अनुप्रमाणीत केला आहे काय?

• मृत्युपत्र करणारी व्यक्ती जर स्वाक्षरी करण्यास असमर्थ असेल तर, इतर कोणी व्यक्तीने, मृत्युपत्र करणाऱ्या व्यक्तीच्या निर्देशानुसार, मृत्युपत्र करणाऱ्या व्यक्तीच्या समक्ष मृत्युपत्रावर स्वाक्षरी केली आहे काय?

• किमान दोन किंवा अधिक साक्षीदारांनी, त्यांची नावे, वय, पत्ता व स्वाक्षरीसह, असे मृत्युपत्र साक्षांकीत केलेले आहे आणि त्यातून मृत्युपत्र साक्षांकीत करणाऱ्या साक्षीदारांच्या समक्ष, मृत्युपत्र करणाऱ्या व्यक्तीने मृत्युपत्रावर स्वाक्षरी केली होती असे दिसून येते काय?

• मृत्युपत्रात उल्लेख केलेल्या मिळकतीबाबत पुरेसे आणि निश्चित वर्णन मृत्युपत्रात आहे काय?

• मृत्युपत्रात शेवटी किंवा स्वतंत्रपणे, मृत्युपत्र करणारी व्यक्ती, मृत्युपत्र करण्यास, शारिरीक व मानसिकरित्या सुदृढ असल्याबाबत डॉक्टरचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. असे प्रमाणपत्र मृत्युपत्राचाच भाग असतो.

• मृत्युपत्र करणाऱ्या व्यक्तीने फक्त स्वसंपादित संपत्तीबाबत तसेच वंशपरंपरेने मिळालेल्या संपत्तीतील फक्त स्वत: च्या हिश्शाबाबतच मृत्युपत्र केले आहे काय?

(वडिलोपार्जित मालमत्तेचे वाटप झाले असेल तर वाटपात मिळालेला असा हिस्सा ही स्वतंत्र मालमत्ता ठरते. ती वडिलोपार्जित मालमत्ता मानता येणार नाही हे लक्षात घ्यावे.)

• वरील बाबींची पूर्तता असेल आणि मुदतीत आक्षेप दाखल नसेल तर मृत्युपत्रान्वये नोंदविलेली फेरफार नोंद प्रमाणीत करण्यास हरकत नाही.

परंतु भारतीय उत्तराधिकार अधिनियम १९२५मधील उपरोक्त बाबींची पूर्तता मृत्युपत्रात केलेली नसेल तर " भारतीय उत्तराधिकार अधिनियम १९२५ मध्ये विहित अटींची पूर्तता मृत्युपत्रात नसल्याने फेरफार नोंद रद्द. जरूर तर संबंधिताने सक्षम न्यायालयातून मृत्युपत्र सिध्द करून आणावे. तोपर्यंत सर्व वारसांची नावे अधिकार अभिलेखात दाखल करावीत" असे नमूद करून फेरफार नोंद रद्द करता येईल.

▶ मुदतीत कोणाचाही आक्षेप दाखल झाल्यास मंडल अधिकाऱ्याने पुढील कार्यवाही करावी.

• मला हिस्सा दिला नाही असा एखाद्या तक्रारकर्ताने आक्षेप घेतला असेल तर "मृत्युपत्रात नमूद मजकुरापेक्षा अन्य बदल करण्याचा अधिकार महसूल यंत्रणेस नाही" असा शेरा लिहून मृत्युपत्रान्वये फेरफार नोंद मंजूर करावी आणि तक्रारदाराला न्यायालयात दाद मागण्यास सांगावे.

• मृत्युपत्र बनावट किंवा खोटे आहे हा आक्षेप असेल किंवा मृत्युपत्राबाबत काही वाद असतील तर सर्व वारसांची नावे अधिकार अभिलेखात दाखल करावीत आणि मृत्युपत्र न्यायालयातून सिद्ध करून आणण्यासाठी सांगावे.

DR. SANJAY KUNDETKAR, Dy. Collector

• मृत्युपत्र करणाऱ्या व्यक्तीची मानसिक अवस्था/मनःस्थिती मृत्युपत्र करतेवेळी सुदृढ नव्हती असा आक्षेप असल्यास सर्व वारसांची नावे अधिकार अभिलेखात दाखल करावीत आणि मृत्युपत्र न्यायालयातून सिद्ध करून आणण्यासाठी सांगावे.

• मयत हिंदू स्त्रीने किंवा हिंदू विधवेने मृत्युपत्रान्वये मालमत्ता दिल्याविरूध्द आक्षेप असेल तर, हिंदू उत्तराधिकार अधिनियम-१९५६, कलम १४ अन्वये हिंदू स्त्री तीची विना अट असलेली मालमत्ता हिंदू स्त्रीने संपूर्ण स्वामी म्हणून धारण करते. त्यामुळे हिंदू स्त्री किंवा हिंदू विधवेला, तिच्याकडे विना अट आलेली मालमत्ता मृत्युपत्रान्वये कोणालाही देण्याचा हक्क आहे.

● मृत्युपत्राबाबत महत्वाचे न्यायनिर्णय:

♦ मृत्युपत्रासाठी कोणताही निश्चित असा नमुना कोणत्याही कायद्यात सांगितलेला नाही. *(वेंकटरामा अय्यर वि. सुंदरमबाळ, ए.आर.आर- १९४० मुंबई- ४०२)*

♦ मृत्युपत्र करणाऱ्याने त्याच्या मालमत्तेची विल्हेवाट त्याच्या मृत्युनंतर कशी लावावी हे स्पष्ट केल्याशिवाय ते मृत्युपत्र पूर्णपणे कायदेशीर होत नाही. *(अहमद बिन सलाह वि. मोहमद बादशहा, ए.आय.आर. १९७२ एस. सी.)*

♦ १८ वर्षाखालील व्यक्तीने केलेले मृत्युपत्र अंमलात येऊ शकणार नाही. तसेच जर ती व्यक्ती अज्ञान असतानाच मृत झाली तरी असे मृत्युपत्र विधिग्राह्य व प्रभावशाली ठरणार नाही. *(के. विजयरत्नम वि. सुदरसनराव ए. आय.आर. १९२०, मद्रास-२३७)*

♦ मृत्युपत्र खरे नाही, ते खोटे आहे हे सिद्ध करण्याची जबाबदारी जो तसा अरोप करतो त्याच्याकडे आहे. *(चंद्रकांत मेढी वि. लखेश्वरनाथ ए.आय.आर- १९७६ गोहत्ती पान -९८)*

♦ मृत्युपत्र हा एक पवित्र दस्त मानला गेला आहे. अशा दस्ताद्वारे मृत व्यक्ती आपल्या संपत्तीच्या विल्हेवाटीबाबतची इच्छा व्यक्त करीत असते. म्हणून मृत्युपत्राचे एक गंभीर व पवित्र दस्त म्हणून पालन केले गेले पाहिजे. *(रामगोपाल लाल वि. ऐपिनकुमार ४९.ए. आय. आर ४१३)*

♦ नॉमिनी हा केवळ एक विश्वस्त असतो. सोसायटी, शेअर्स, विमा अशा ठिकाणी नॉमिनेशन करावे लागते. मात्र नॉमिनी व्यक्तीस काही मालकी हक्क प्राप्त होत नाही. ती एक तात्पुरती सोय असते जेणेकरून मयत व्यक्तीच्या मिळकतीसंदर्भात पत्रव्यवहार इ. करता यावा. नॉमिनेशन हा काही वारसा हक्काचा तिसरा कायदा होऊ शकत नाही. *(मा. उच्च न्यायालय, मुंबई-शशिकिरण पारेख विरुद्ध राजेश अग्रवाल २०१२ (४) एमएच.एल.जे. ३७०)*

♦ हिंदू विधवा स्त्रीला, सन १९५६ नंतर, तिच्या पतीच्या निधनानंतर मिळकत प्राप्त झाली असेल तर ती त्या मिळकतीची संपूर्ण मालक बनते. व त्यानंतर त्या विधवेने लग्न केले तरीही तिला पती निधनानंतर मिळालेल्या मिळकतीवरील तिचा हक्क नष्ट होत नाही. *(ए.आय.आर. १९७१, मुंबई, ४१३)*

♦ वडीलांनी वाटपात मिळालेल्या मिळकतीतून काही मिळकत खरेदी केल्यास ती मिळकत वडिलांच्या मालकीची होईल. त्या मिळकतीत त्यांची आपत्ये सहदायाद (कोपार्सनर) नसतील. *(ऑल महाराष्ट्र रिपोर्टर २००५ (३), ७८९)*

K.KUNDETKAR, Dy.Collector

♦ स्त्री-धनाची मिळकत ही त्या स्त्रिच्या संपूर्ण मालकीची असते. तिला त्याची वैयक्तिक इच्छेनुसार विल्हेवाट लावता येते. स्त्री-धन हिंदू एकत्र कुटुंबाच्या मिळकतीचा भाग नसतो. *(ऑल महाराष्ट्र रिपोर्टर २०११ (६), ४२८ एस.सी.)*

♦ बेकायदेशीरपणे केलेल्या दुसऱ्या लग्नातील पत्नीला मयत पतीच्या मिळकतीत वारसा हक्क किंवा हिस्सा मिळत नाही. परंतु दुसऱ्या लग्नापासून जन्मलेली आपत्ये वारस ठरतील. *(ए.आय.आर. २००२, गोहत्ती, ९६)*

♦ मा. उच्च न्यायालयाने, भारतीय उत्तराधिकार कायदा, १९२५ अन्वये असलेले मृत्युपत्र सिध्द करण्यासाठी मार्गदर्शन करतांना न्यायालयांसाठी मृत्युपत्र तपासणीचे पाच टप्पे विहित केले आहेत.

१. मृत्युपत्र हे लिखित स्वरूपात असावे, त्यावर मृत्युपत्र करणाऱ्याची स्वाक्षरी असावी. तसेच दोन किंवा अधिक साक्षीदारांनी स्वत:च्या स्वाक्षरीने मृत्युपत्र करणाऱ्याची स्वाक्षरी साक्षांकीत केलेली असावी. जरूर तर न्यायालय किमान एक साक्षीदाराची अशा साक्षांकनाबाबत तपासणी करू शकेल. हा पहिला टप्पा आहे. उपरोक्त कायदेशीर बाबींची पुर्तता मृत्युपत्रात केली नसेल तर कायद्याच्या दृष्टिने ते मृत्युपत्रच नाही.

२. मृत्युपत्रामुळे जेव्हा कायदेशीर वारस विस्थापित होतात तेव्हा न्यायालयाने सर्वसाधारण तपासणी न करता मृत्युपत्राबाबत सखोल छाननी करणे आवश्यक आहे. हा दुसरा टप्पा आहे.

३. मृत्युपत्र करणाऱ्या व्यक्तीची मानसिक अवस्था/मनःस्थिती मृत्युपत्र करतेवेळी सुदृढ होती किंवा नाही याची तपासणी करणे हा तिसरा टप्पा आहे.

४. चौथ्या टप्प्यात, मृत्युपत्र संदर्भात कोणतीही संशयास्पद परिस्थिती अस्तित्वात आहे काय याची तपासणी करावी.

५. पाचव्या टप्प्यावर, मृत्युपत्र भारतीय उत्तराधिकार कायदा, कलम ६३ सह भारतीय पुरावा कायदा, कलम ६८ अनुसार आहे किंवा नाही याची खात्री करावी.

(मा. उच्च न्यायालय- जे टी. सुरप्पा वि. सच्चिदानंदेंद्र सरस्वती स्वामीजी पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट - आयएलआर-२००८- केआर-२११५)

♦ प्रतिबंधित सत्ताप्रकारच्या जमिनीचे मृत्युपत्र अवैध – मा. सर्वोच्च न्यायालय

यापूर्वी मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथे दाखल रिट याचिका क्रमांक २४१५/ २०१३, राधाकिशन मारूती घोलप विरूध्द महाराष्ट्र शासन व इतर या प्रकरणात मा. न्यायमुर्ती श्री. पी. आर. बोरा यांनी दिनांक ४.७.२०१६ राजी निकाल दिला होता की, "मालमत्ता हस्तांतरण कायद्यात कलम ५ अन्वये केलेली 'हस्तांतरण' ही व्याख्या मृत्युपत्राला लागू होणार नाही. त्यामुळे एखाद्या जमिनीच्या इतर हक्कात सक्षम अधिकाऱ्याच्या परवानगीशिवाय हस्तांतरणास बंदी असा शेरा असल्यास त्या जमिनीबाबत केलेले मृत्युपत्र वैध ठरेल."

तथापि, आता मा. सर्वोच्च न्यायालयाच्या, मा. श्री. उदय उमेश ललित, मा. श्रीमती इंदू मल्होत्रा आणि मा. श्री. ए.एस. बोपण्णा या न्यामुर्तींच्या तीन सदस्सीय विभागीय खंडपीठाने, दिनांक १५.६.२०२० रोजी, दिवाणी अपील क्रमांक २५७३/ २०२० व इतर (SLP (C) क्रमांक १८५२५/२००९ मधून उद्भवलेले इ.)

Dr. SANJAY KUNDETKAR, Dy. Collector

विनोदचंद्र सक्रलाल कपाडिया इ. विरुद्ध गुजरात राज्य आणि इतर या प्रकरणात निकाल देऊन स्पष्ट केले आहे की, प्रतिबंधित सत्ताप्रकारच्या जमिनीबाबत केलेले मृत्युपत्र अवैध ठरेल.

सदर प्रकरणात खालील दोन प्रश्ने निर्णयासाठी होती:
(१) एखाद्या शेतकऱ्याला त्याची शेतजमीन, मृत्युपत्राव्दारे शेतकरी नसलेल्या व्यक्तीला देण्यास मुंबई कुळवहिवाट आणि शेतजमीन अधिनियम १९४८, कलम ६३ (शेतकरी नसलेल्या व्यक्तीकडे हस्तांतरण करण्यास प्रतिबंध) ची बाधा येईल काय?
आणि
(२) मुंबई कुळवहिवाट आणि शेतजमीन अधिनियम १९४८, कलम १७-ब, ३२, ३२-फ, ३२-आय, ३२-ओ, ३२-पी, ३२-यु, ३३(१), ८८-ई किंवा ६४ अन्वये कुळाने खरेदी केलेली जमीन, मृत्युपत्राव्दारे शेतकरी नसलेल्या व्यक्तीला देण्यास मुंबई कुळवहिवाट आणि शेतजमीन अधिनियम १९४८, कलम ४३(१) (सदर कुळ कायद्यान्वये कुळाने खरेदी केलेल्या जमिनीच्या हस्तांतरणावर निर्बंध) ची बाधा येईल काय?

उक्त प्रश्नांवर मा. सर्वोच्च न्यायालयाने खालील उत्तरे दिली आहेत:
(१) सामान्य नियम असा आहे की, कोणत्याही प्रकारची मालमत्ता, जोपर्यंत कोणत्याही कायद्याच्या अस्तित्वामुळे हस्तांतरणास प्रतिबंध केला जात नसेल तर भेट, विक्री किंवा मृत्युपत्र इत्यादीद्वारे हस्तांतरित केली जाऊ शकते. (property of any kind may be transferred by way of gift or Will, sale etc. unless non transferability is barred due to existence of any law.)

(२) मृत्युपत्राशी संबंधित विलियनचा कायदा (Willian's law), सहावी आवृत्ती, खंड I, पृष्ठ ६० वर नमुद आहे की, मृत्युपत्राची शक्ती मृत्युपत्रकर्त्यांच्या मर्जीनुसार नसते तर कायद्याद्वारे मान्यताप्राप्त असलेल्या हितसंबंधांच्या निर्मितीपर्यंतच त्याचा विस्तार होतो. (the power of disposition by Will is not at the testator's caprice, but extends only to the creation of those interests, which are recognized by law.)

(३) कुळ कायद्यान्वये, सक्षम अधिकाऱ्याच्या परवानगीशिवाय शेतजमिनीचे विभाजन बिगर शेतकरी व्यक्तीच्या लाभात करणे अधिकृत नाही त्यामुळे जर मृत्युपत्राद्वारे बिगर शेतकरी व्यक्तीला शेतजमीन देण्याची परवानगी दिली गेली, तर ते कायद्याच्या आत्म्याला पराभूत करेल, ज्याला परवानगी दिली जाऊ शकत नाही.
(Tenancy Act has not authorized parting of agricultural land to a non-agriculturist without the permission of the authorized officer, therefore, if it is permitted through a testamentary disposition, it will be defeating the very soul of the legislation, which cannot be permitted.)

(४) आम्हाला आश्चर्य वाटते की, मृत्युपत्र करणाऱ्या व्यक्तीला, त्याच्या हयातीतही बिगर शेतकरी व्यक्तीला शेतजमीन हस्तांतरीत करण्यापासून वैधानिकरित्या प्रतिबंधित केले आहे, मग त्याच्या मृत्युनंतर अशी शेतजमीन बिगर शेतकरी व्यक्तीला हस्तांतरित करण्याचा त्याचा इरादा जाहीर करण्याची परवानगी

Dr. SANJAY KUNDETKAR, Dy. Collector

कशी दिली जाऊ शकते. मृत्युपत्र करणाऱ्याचा असा प्रयत्न, आमच्या दृष्टीने, सार्वजनिक धोरणाच्या स्पष्टपणे विरुद्ध आहे आणि कुळ कायद्याच्या उद्दीष्ट आणि हेतूला पराभूत करणारा आहे. (We wonder when testator statutorily debarred from transferring the agricultural lands to a non-agriculturist during his life time, then how he can be permitted to make a declaration of his intention to transfer agricultural land to a non-agriculturist to be operative after his death. Such attempt of testator, in our view, is clearly against the public policy and would defeat the object and purpose of the Tenancy Act.)

(५) हिंदू उत्तराधिकार कायद्याचे कलम ३० मृत्युपत्राला वारसाहक्काचा एक प्रकार म्हणून मान्य करते, परंतु, कुळ कायद्यासारख्या कोणत्याही कायद्याच्या उद्देशाला आणि हेतूला पराभूत करून नाही. (Section 30 of the Hindu Succession Act acknowledges testamentary succession as a mode of succession, but not, by defeating the purpose and object of any legislation, like Tenancy Law.)

(६) शेतजमीन बिगर शेतकरी लोकांच्या हातात जाऊ नये असा कायद्याचा हेतू मुंबई कुळकायदा, कलम ६३ मध्ये स्पष्ट आहे. आपल्यासारख्या देशात जिथे शेती हे उपजीविकेचे मुख्य साधन आहे, तिथे कलम ६३ अन्वये घातलेल्या निर्बंधाला एखाद्या डावपेचाने परवानगी दिली जाऊ शकत नाही. अकृषिक उद्देशासाठी शेतजमिनींचे अंदाधुंद रूपांतर रोखणे हा कलम ६३ चा स्पष्ट उद्देश आहे आणि ही तरतूद धारकांच्या लहरीनुसार किंवा इच्छेनुसार शेतजमिनीचा वापर केला जाणार नाही या गृहितकाला बळकट करते. (The legislative intent that an agricultural land shall not go into the hands of a non-agriculturist is manifest in Section 63 of the Bombay Tenancy Act. In a country like ours where agriculture is the main source of livelihood, the restriction imposed in Section 63, cannot be given a go-by, by a devise. Obvious purpose of Section 63, is to prevent indiscriminate conversion of agricultural lands for non-agricultural purpose and that provision strengthens the presumption that agricultural land is not to be used as per the holder's caprice or sweet-will.)

(७) खरे तर, या न्यायालयाने प. बंगाल राज्य वि. कैलाशचंद्र कपूर व इतर या प्रकरणात दिलेल्या निर्णयानुसार, मृत्युपत्राद्वारे मालमत्तेचे हस्तांतरण हे मालमत्तेच्या हस्तांतरणासारखे होत नाही ज्यामध्ये असे आढळून आले आहे की, सामान्यतः हस्तांतरण हे दोन जिवंत व्यक्तींमध्ये होते, तथापि, मृत्युपत्र करणाऱ्याच्या निधनानंतर मृत्युपत्र लागू होते आणि त्या दृष्टीकोनातून ते हस्तांतरणाशी विसंगत होते. (In fact, in view of the decision of this Court in *State of W.B. v. Kailash Chandra Kapur,* devolution of property by way of a will does not amount to a transfer of the property wherein it has been observed that transfer connotes, normally, between two living persons during life. However, a will takes effect after demise of the testator and transfer in that perspective becomes incongruous.)

DR. SANJAY KUNDETKAR, Dy. Collector

(८) असा प्रश्न उपस्थित होतो की, कोणतीही हयात व्यक्ती, कोणत्याही कायद्याचे उल्लंघन करून कागदपत्र निष्पादीत करू शकते काय? याचे उत्तर नेहमीच नकारार्थी असते. जर कायदा परवानगी देत नसेल आणि काही गोष्टी करण्यास मनाई असेल किंवा विशिष्ट कृतींशिवाय काही कृती करण्यास मनाई असेल, तर कोणतेही दस्तऐवज किंवा करार किंवा कायद्याच्या अशा तरतुदीचे उल्लंघन करणारी कोणतीही गोष्ट बेकायदेशीर आणि अवैध आहे.

(The question arises as to whether any living person can execute a document in contravention of any law. The answer is always in negative. If law do not permit and there is a prohibition to do certain thing, or there is a prohibition to do certain act except in certain manner, any document or agreement or anything in contravention to such provision of law, is illegal and invalid.)

(९) एखाद्या व्यक्तीच्या हयातीत, जर त्या व्यक्तीवर काही कागदपत्रे अंमलात आणण्याचे बंधन असेल आणि त्याद्वारे त्याची वहिवाट हस्तांतरित करण्याचा त्याला अधिकार नसेल किंवा एखाद्या किंवा इतर कायद्यांतर्गत त्याचे हितसंबंध हस्तांतरित करण्याचा अधिकार नसेल, तर अशा मालमत्तेबाबत अशा कायद्याचे उल्लंघन करून तो मृत्युपत्रासह असा कोणताही दस्तऐवज करून त्याची इच्छा आणि हेतू अंमलात आणू शकत नाही.

(During the lifetime of a living person, if the person is under restriction to execute certain document and thereby has no right to transfer his occupancy or no right to transfer his interest under one or other Act, he cannot execute any document, including a will showing his wish and intention in regard to such property in contravention of such law.)

(१०) त्यामुळे, जरी हे मान्य केले की, विद्यमान मालमत्तेचे एका हयात व्यक्तीद्वारे दुसऱ्या हयात व्यक्तीकडे हस्तांतरण हे कायद्यांच्याच्या दृष्टीने 'हस्तांतरण' आहे आणि मृत्युपत्राद्वारे मालमत्ता देणे हे जरी 'हस्तांतरण' या संज्ञेमध्ये समाविष्ट होत नसले तरीही, अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याचे उल्लंघन करून मृत्युपत्र केले असल्यास, अशा इच्छेकडे दुर्लक्ष करण्याची सक्षम प्राधिकरणाला नेहमीच सूट असते आणि अशा इच्छेच्या आधारावर फेरफार नोंदवून नाव बदलण्यास नकार देता येतो.

(Therefore, even if it is accepted that the transfer under the Transfer of Property Act is a conveyance of an existing property by one living person to another, and will does not involve any transfer, but if a will is executed in contravention of law, it is always open to the authority to ignore such will and may refuse to mutate the name on the basis of such will.)

मा. सर्वोच्च न्यायालयाच्या उपरोक्त आदेशान्वये अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याच्या तरतुदीचे उल्लंघन करून करण्यात आलेले मृत्युपत्र अवैध ठरेल आणि त्याची नोंद घेण्याचे बंधन असणार नाही.

Dr. S. KUNDETKAR, Dy Collector

♦ मा. उच्च न्यायालय, मुंबई- औरंगाबाद खंडपीठ. (अपील अधिकार क्षेत्र) माननीय न्यायमूर्ती :
मा. श्री. पी.आर. बोरा
प्रकरण: राधाकिसन मारुती घोलप वि. महाराष्ट्र राज्य, (महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई)
रिट याचिका क्र. २४१५/२०१३; दिनांक ४.७.२०१६
कायदा: म.ज.म.अ. कलम ३६(२) आणि ३६-अ; महाराष्ट्र शेतजमीन (धारणेची कमाल मर्यादा) कायदा १९६१, कलम २९
मा. उच्च न्यायालयाची निरीक्षणे:
सध्याच्या याचिकेत उपस्थित करण्यात आलेला प्रश्न असा आहे की "महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६, कलम ३६(२) आणि ३६-अ अन्वये आदिवासी व्यक्तीची जमीन बिगर आदिवासी व्यक्तीला हस्तांतरित करण्याबाबत विहित केलेले निर्बंध, मृत्युपत्राव्दारे बिगर आदिवासी व्यक्तीला दिलेल्या जमिनीस लागू होतील काय?''

उक्त निर्बंध महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६, कलम ३६(२) आणि ३६-अ तसेच महाराष्ट्र शेतजमीन (धारणेची कमाल मर्यादा) कायदा १९६१, कलम २९ अन्वयेही विहित केलेले आहेत.

मा. सर्वोच्च न्यायालयाने, प्रभाकर चिनप्पा चव्हाण वि. महाराष्ट्र शासन या प्रकरणात निर्णय देतांना स्पष्ट नमूद केले आहे की, महाराष्ट्र शेतजमीन (धारणेची कमाल मर्यादा) कायदा १९६१ या कायद्यांतर्गत मालमत्तेच्या हस्तांतरणामध्ये मृत्युपत्राचा समावेश होणार नाही. (the transfers under the Ceiling Act do not include testamentary disposition of the property.)

मा. सर्वोच्च न्यायालयाच्या उक्त निकालपत्राचा संदर्भ, या न्यायालयाने विमलाबाई गोविंद जुवेरकर वि. महाराष्ट्र राज्य (1976 Mh.L.J. 858) या प्रकरणात सुध्दा घेतला आहे.
विमलाबाई गोविंद जुवेरकर वि. महाराष्ट्र राज्य आणि इतर (सुप्रा), आणि प्रभाकर चिनप्पा चव्हाण वि. महाराष्ट्र राज्य (सुप्रा) हे दोन्ही निकाल या प्रकरणातील तथ्यांना पूर्णपणे लागू होतात.

या न्यायालयाने नमूद केल्याप्रमाणे, मालमत्ता हस्तांतरण कायदा कलम ५ अन्वये असलेली 'हस्तांतरण' या व्याख्येमध्ये मृत्युपत्राचा समावेश होत नाही. त्यामुळे, आदिवासीकडून बिगर -आदिवासीकडे जमीन हस्तांतरित करण्यासाठी महाराष्ट्र जमीन महसूल संहितेच्या कलम ३६(२) आणि कलम ३६-अ अन्वये विहित केलेले निर्बंध, मृत्युपत्राव्दारे केलेल्या जमिनीच्या हस्तांतरणास लागू होणार नाहीत, असे मानण्यास मला कोणताही संकोच वाटत नाही.
(a testamentary disposition by Will is not covered by the word 'transfer' as per the provisions of section 5 of the Transfer of Property Act. I have, therefore, no hesitation in holding that, restrictions prescribed under Section 36(2) and Section 36-A of the MLR Code for transfer of land from a tribal to a non-tribal would not apply to transfers of lands by testamentary disposition.)

Dr. SANJAY KUNDETKAR, Dy. Collector

♦ मा. उच्च न्यायालय, मुंबई
प्रकरण: काशिनाथ विरुध्द गणपत, २००३(३), एम.एल.जे. २२९:
मा. उच्च न्यायालयाची निरीक्षणे:
कुळाचे हक्क, बक्षीसपत्राद्वारे किंवा मृत्युपत्राद्वारे हस्तांतरित होऊ शकत नाहीत, कुळ, आपले हक्क मृत्युपत्र किंवा बक्षीस पत्राद्वारे हस्तांतर करु शकत नाही आणि त्यानुसार कुळाचे हक्क प्राप्त होत नाहीत. मुंबई कुळ कायदा कलम २७ प्रमाणे असे हस्तांतरण बेकायदेशीर आहे.

♦ मा. सर्वोच्च न्यायालय, दिवाणी अपील अधिकार क्षेत्र - माननीय न्यायमूर्ती (खंडपीठः): मा. श्री. उदय उमेश ललित, मा. श्री. मोहन एम. शांतनगौदार, मा. श्री. विनीत सरन
प्रकरण: विनोदचंद्र सक्रलाल कपाडिया विरुद्ध गुजरात राज्य
सिव्हिल अपील क्र.२५७३ इ./२०२० दिनांक: १५ जुन, २०२०
विनोदचंद्र सक्रलाल कपाडिया इ. विरुद्ध गुजरात राज्य आणि इतर.

मा. सर्वोच्च न्यायालयाची निरीक्षणे:
मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम १९४८, कलम ६३ तसेच १७-ब, ३२, ३२-फ अन्वये मिळालेली जमीन एखाद्या शेतकऱ्याला मृत्युपत्रान्वये बिगर शेतकरी व्यक्तीला देता येते काय? हे ठरवण्यासाठी आम्हाला विनंती करण्यात आली आहे.

मृत्युपत्राशी संबंधित विलियन कायदा (Willians law), सहावी आवृत्ती, खंड I, पृष्ठ ६० वर असे नमूद आहे की, मृत्युपत्र करण्याचा हक्क हा मृत्युपत्रकर्त्यांच्या मर्जीनुसार नाही, तर ज्या तरतुदींना कायद्याने मान्यता दिली आहे फक्त त्या हितसंबंधांच्या निर्मितीसाठी वापरता येईल. (Will is not at the testator's caprice, but extends only to the creation of those interests, which are recognised by law)

कुळ कायद्यान्वये सक्षम अधिकाऱ्याच्या परवानगीशिवाय बिगर शेतकरी व्यक्तीला शेतजमिनीचे हस्तांतरण करण्याचा अधिकार दिलेला नाही, म्हणून, जर मृत्युपत्राद्वारे बिगर शेतकरी व्यक्तीला शेतजमीन देण्याची परवानगी दिली गेली तर अशी तरतूद या कायद्याच्या आत्म्यालाच पराभूत करेल, ज्याला परवानगी दिली जाऊ शकत नाही.

आम्हाला आश्चर्य वाटते की, जेव्हा मृत्युपत्रकर्त्याला त्याच्या हयातीत शेतजमिनी बिगर-शेतकऱ्यांना हस्तांतरित करण्यापासून वैधानिकरित्या प्रतिबंधित केले आहेत तर त्याला त्याच्या हयातीनंतर मृत्युपत्राने अशी शेतजमीन हस्तांतरित करण्याचा त्याचा हेतू जाहीर करण्याची परवानगी कशी दिली जाऊ शकते? मृत्युपत्र करणाऱ्याचा असा प्रयत्न, आमच्या मते, सार्वजनिक धोरणाच्या स्पष्टपणे विरुद्ध आहे आणि कुळ कायद्याच्या कायद्याच्या उद्देशाला हरवणारा आहे.

हिंदू उत्तराधिकार कायद्याच्या कलम ३० मध्ये वारसाहक्काचा एक प्रकार म्हणून मृत्युपत्र स्वीकारले जो. परंतु, कुळ कायद्यासारख्या कोणत्याही कायद्याच्या उद्देशाला ते पराभूत करू शकणार नाही.

Dr. SANJAY KUNDETKAR, Dy. Collector

मुंबई कुळ कायदा, कलम ६३ चा उद्देशच शेतजमीन बिगरशेतकरी व्यक्तीच्या हातात जाऊ नये असा आहे हे स्पष्ट आहे. आपल्यासारख्या देशात जिथे शेती हेच उपजीविकेचे मुख्य स्त्रोत आहे तिथे कलम ६३ अन्वये घातलेल्या निर्बंधाला वाऱ्यावर सोडले जाऊ शकत नाही. कलम ६३ चा स्पष्ट उद्देश, शेतजमिनींचे अंदाधुंद हस्तांतरण रोखणे हा आहे.

जरी हे मान्य केले की, मालमत्ता हस्तांतरण कायद्यांतर्गत, हस्तांतरण हे विद्यमान मालमत्तेचे एका हयात व्यक्तीद्वारे दुसऱ्या हयात व्यक्तीकडे हस्तांतरित करणे आहे आणि मृत्युपत्रात असे कोणतेही हस्तांतरण समाविष्ट नाही, तथापि, जर एखाद्या मृत्युपत्राची अंमलबजावणी कायद्याचे उल्लंघन करत असेल तर, अशा मृत्युपत्राकडे दुर्लक्ष करणे प्राधिकरणासाठी नेहमीच खुले असते आणि अशा मृत्युपत्राच्या आधारावर बदलण्यास नकार देता येऊ शकेल.

तथापि, कर्नाटक जमीन सुधारणांच्या कलम २१ आणि २४ च्या तरतुदीन्वये, मृत्युपत्र हे मयत व्यक्तीच्या वारसांपुरते मर्यादित असणे आवश्यक आहे. कुळ हक्क हे केवळ कायदेशीर प्रतिनिधींना वारस हक्काने मिळू शकतात, इतर कोणाकडूनही नाहीत. कुळाच्या वारसांच्या नावे कुळ वहिवाट चालू ठेवली आहे असे मानले जाऊ शकते.

कर्नाटक जमीन सुधारणांच्या कलम २१ अन्वये कुळाचा मृत्यू झाल्यावर, संयुक्त कुटुंबातील हयात असलेले सदस्य आणि तो संयुक्त कुटुंबाचा सदस्य नसल्यास, त्याच्या वारसांना काही अटींच्या अधीन राहून कुळ हक्काने दिलेल्या जमिनीचे विभाजन आणि उप-विभाजन करण्याचा अधिकार असेल. या कायद्याच्या कलम २४ अन्वये, जेव्हा कुळाचा मृत्यू होतो, तेव्हा जमीनमालकाने अशा कुळाच्या वारसांनी त्याच अटी व शर्तींवर कुळ वहिवाट चालू ठेवल्याचे मानले जाते ज्यावर कुळ त्याच्या मृत्यूच्या वेळी जमीन धारण करत होता.
(उक्त तरतुदीसारखी तरतूद, मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम १९४८, कलम ४० अन्वये आहे.)

♦ मा. सर्वोच्च न्यायालय, दिवाणी अपील अधिकार क्षेत्र - माननीय न्यायमूर्ती : मा. श्री. एम.आर. शाह, मा. श्री. अनिरुद्ध बोस
प्रकरण: जितेंद्र सिंह विरुद्ध मध्य प्रदेश राज्य आणि आणि इतर.
विशेष रजा याचिका क्र.१३१४६/२०२१ दिनांक: ६ डिसेंबर, २०२१
मा. सर्वोच्च न्यायालयाची निरीक्षणे:
सदर प्रकरणात, एका आजीने त्याच्या नातवाच्या नावे मृत्युपत्र करून ठेवले होते आणि त्या मृत्युपत्राची नोंद, मृत्युपत्र करून देणार आहे हयात असतानाच महसुली अभिलेखात नोंदवली गेली. त्याविरुद्ध अन्य वारसदारांनी दावा दाखल केला होता. अपील आणि सुनावणीचे विविध टप्पे पार करत सदर प्रकरण शेवटी माननीय सर्वोच्च न्यायालयासमोर सुनावणीसाठी आले होते.

मा. सर्वोच्च न्यायालयाने सदर निकालपत्रात पुन्हा स्पष्ट केले आहे की,
सन १९७७ पासून कायदा अगदी स्पष्ट आहे. बलवंत सिंग विरुद्ध दौलत सिंग ((1997) 7 SCC 137) प्रकरणात, मा. सर्वोच्च न्यायालयासमोर फेरफार नोंदीचा परिणाम विचारात घेण्याचा एक प्रसंग होता आणि त्याच वेळेस असे ठरवले गेले होते की, मालमत्तेच्या संदर्भातील महसुली अभिलेखातील फेरफार नोंदी या

Dr SANJAY KUNDETKAR, Dy. Collector

मालमत्तेवर कोणत्याही प्रकारचा हक्क तयार करीत नाहीत किंवा नष्ट ही करीत नाहीत किंवा हक्काच्या बाबतीत त्यांचे कोणतेही अनुमानित मूल्य (presumptive value) नाही. अशा नोंदी केवळ जमीन महसूल गोळा करण्याच्या उद्देशानेच संबंधित असतात. त्यानंतर झालेल्या निर्णयांच्या मालिकेतही असेच मत व्यक्त करण्यात आले आहे.

सूरज भान विरुद्ध वित्तीय आयुक्त, (2007) 6 SCC 186 मधील प्रकरणात, या न्यायालयाने असे निरीक्षण नोंदविले आहे की, अधिकार अभिलेखात ज्याचे नाव दर्शविले जाते, त्याला अशा नोंदी कोणताही हक्क प्रदान करत नाहीत, महसूल अभिलेखातील नोंदी किंवा जमाबंदीमधील नोंदींचा उद्देश फक्त "आर्थिक" (fiscal purpose) असतो. म्हणजे, जमीन महसूल कोणी अदा करावा यासाठी या नोंदी असतात आणि अशा नोंदींच्या आधारे कोणतीही मालकी प्रदान केली जात नाही.

सुमन वर्मा वि. युनियन ऑफ इंडिया, (2004) 12 SCC 58; फकरुद्दीन वि. ताजुद्दीन (2008) 8 SCC 12; राजिंदर सिंग विरुद्ध जम्मू-काश्मीर राज्य, (2008) 9 SCC 368; महानगरपालिका, औरंगाबाद विरुद्ध महाराष्ट्र राज्य, (2015) 16 SCC 689; टी. रवी विरुद्ध बी. चिन्ना नरसिंह, (2017) 7 SCC 342; भीमाबाई महादेव कांबेकर वि. आर्थर इम्पोर्ट अँड एक्सपोर्ट कं., (२०१९) ३ SCC 191; प्रल्हाद प्रधान वि. सोनू कुम्हार, (2019) 10 SCC 259; आणि अजित कौर विरुद्ध दर्शन सिंग, (2019) 13 SCC 70 या प्रकरणांमध्येही असेच निरीक्षण नोंदवले गेले आहे.

कायद्याच्या स्थायिक प्रस्तावानुसार, हक्काच्या (title) संदर्भात काही विवाद असल्यास आणि विशेषत: जेव्हा फेरफार नोंद मृत्युपत्राच्या आधारावर करण्याची मागणी केली जाते तेव्हा, जो पक्षकार मृत्युपत्राच्या आधारावर हक्काचा दावा करत आहे त्याला योग्य त्या दिवाणी न्यायालयात दाद मागावी लागेल आणि त्याचे अधिकार निर्विवादपणे सिध्द करून घ्यावे लागतील आणि त्यानंतरच दिवाणी न्यायालयाच्या निर्णयाच्या आधारे आवश्यक ती फेरफार नोंद नोंदवता येईल.

♦ मा. सर्वोच्च न्यायालय, दिवाणी अपील अधिकार क्षेत्र - माननीय न्यायमूर्ती : मा. श्री. संजय करोल, मा. श्री. अभय ओक
प्रकरण: मीना प्रधान विरुद्ध कमला प्रधान व इतर
सिव्हिल अपील क्र.३३५१/२०१४ दिनांक: २१ सप्टेंबर, २०२३
कायदा: भारतीय उत्तराधिकार कायदा १९२५, कलम – ६३- विशेषाधिकार नसलेल्या मृत्युपत्रांची अंमलबजावणी. (Execution of unprivileged wills)

मा. सर्वोच्च न्यायालयाची निरीक्षणे:
प्रथम या खटल्याची वस्तुस्थिती जाणून घेण्यापूर्वी संबंधित कलम समजून घेऊ.
भारतीय उत्तराधिकार कायदा, १९२५, कलम ६३ अन्वये, मृत्युपत्र करणारी व्यक्ती, जर तो मोहिमेत कार्यरत किंवा प्रत्यक्ष युद्धात गुंतलेला सैनिक नसेल, किंवा एरवी नोकरीवर असलेला किंवा गुंतलेला, किंवा समुद्रात जाणारा नाविक नसेल तर तो खालील नियमांनुसार त्याचे मृत्युपत्र बनवेल:
अ) मृत्युपत्र करणाऱ्याने मृत्युपत्रावर त्याची स्वाक्षरी करावी किंवा त्याचे चिन्ह उमटवावे. किंवा मृत्युपत्रावर, मृत्युपत्रकर्ताच्या निर्देशानुसार अन्य व्यक्तीची स्वाक्षरी केली जाईल.

Dr. SANJAY KUNDETKAR, Dy. Collector

(ब) मृत्युपत्र करणाऱ्याची स्वाक्षरी किंवा चिन्ह किंवा मृत्युपत्रावर, मृत्युपत्रकर्ताच्या निर्देशानुसार स्वाक्षरी करणारी अन्य व्यक्तीची स्वाक्षरी अशा प्रकारे करण्यात येईल की, त्याद्वारे त्या लेखनाला मृत्युपत्राच्या रूपात परिणाम देण्याचा हेतू होता हे सिध्द होईल.
(क) मृत्युपत्रावर मृत्युपत्रकर्ताने प्रत्येकी दोन किंवा अधिक साक्षीदारांसमक्ष मृत्युपत्रावर स्वाक्षरी करावी आणि साक्षीदारांद्वारे हे प्रमाणित केले जाईल.
एकाच वेळी एकापेक्षा जास्त साक्षीदार हजर असणे आवश्यक नाही.
मृत्युपत्र सांक्षांकीत करण्यासाठी कोणत्याही विशिष्ट प्रकारचे फॉर्म आवश्यक नाही.

मृत्युपत्र हे मृत्युपश्चात मालमत्ता वितरणाचे एक कायदेशीर, मान्यताप्राप्त साधन आहे.
मृत्युपत्राची अंमलबजावणी, मृत्युपत्र करणाऱ्याच्या हयाती नंतर केली जाईल.
मृत्युपत्रासोबत पवित्रतेचा एक घटक संलग्न असतो. मृत्युपत्र करणाऱ्याची शेवटची ईच्छा मृत्युपत्रातून व्यक्त होते.

मृत्युपत्रकर्ता मृत्युपत्राच्या दस्तऐवजाची वैधता तपासण्यासाठी उपलब्ध नसतो म्हणून मृत्युपत्राची वैधता सिध्द होण्यासाठी पुराव्यांची आवश्यकता असते.
जेव्हा जेव्हा मृत्युपत्राबद्दल कोणतीही शंका असते तेव्हा ती शंका ठोस पुराव्यांसह दूर करणे ही मृत्युपत्र सादर करणाऱ्याची जबाबदारी आहे. मृत्युपत्र फसवणूक करून बनवले आहे, बनावट आहे, अवाजवी प्रभावाखाली कलेले आहे इत्यादी आरोप करणाऱ्याला ते सिद्ध करावे लागेल.

वरील सर्व निकालपत्रांचा एकत्रीतपणे अभ्यास करता उक्त प्रश्नाची खालील उत्तरे प्राप्त होतात.

♦ धारणाधिकार वर्ग दोन असलेल्या जमिनीचे मृत्युपत्र करता येते काय?

☑ मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार, महाराष्ट्र शेतजमीन (धारणेची कमाल मर्यादा) कायदा १९६१ या कायद्यांतर्गत मालमत्तेच्या हस्तांतरणामध्ये मृत्युपत्राचा समावेश होणार नाही. मालमत्ता हस्तांतरण कायदा कलम ५ अन्वये असलेली 'हस्तांतरण' या व्याख्येमध्ये मृत्युपत्राचा समावेश होत नाही. त्यामुळे धारणाधिकार वर्ग दोन असलेल्या खालील काही जमिनीचे मृत्युपत्र करता येईल.

(ए) विविध कुळ वहिवाट व शेतजमीन अधिनियमान्वये कुळाला मालकी हक्काने प्राप्त झालेल्या जमिनी. उदा. महाराष्ट्र कुळ वहिवाट व शेतजमीन अधिनियम १९४८, कलम ३२ म प्रमाणपत्र प्राप्त जमिनी. अशा जमिनींच्या हस्तांतरणावर निर्बंध असले तरी 'मृत्युपत्र' चा समावेश 'हस्तांतरण' या व्याख्येत होत नाही. तथापि, असे मृत्युपत्र हे भावी वारसांच्या लाभात असावे. त्रयस्थ व्यक्तीच्या लाभात नाही.

(बी) नवीन किंवा जुन्या शर्तीवर, कब्जेहक्काची रक्कम अदा करून रिग्रँट केलेल्या विविध इनाम व वतन जमिनी, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ अन्वये विविध योजनांतर्गत प्रदान/ अतिक्रमण नियमानुकूल करून भूमीहीन, शेतमजूर, स्वातंत्र सैनिक इत्यादींना प्रदान केलेल्या जमिनी, महाराष्ट्र जमीन (धारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१ अंतर्गत वाटप केलेल्या जमिनी, महाराष्ट्र पुनर्वसन अधिनियम १९९९ च्या कलम १६ अन्वये प्रदान केलेल्या जमिनी,

DR.SANJAY KUNDETKAR Dy. Collector

भूमीधारी हक्कान्वये प्राप्त झालेल्या जमिनी, महाराष्ट्र जमीन (धारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१ अन्वये कमाल मर्यादेपेक्षा अधिक धारण करण्यास सूट दिलेल्या जमिनी या जमिनींचे मृत्युपत्र भावी वारसांच्या लाभात करता येईल, त्रयस्थ व्यक्तीच्या लाभात नाही.

♦ कुळाला, त्याच्या ताब्यात कुळ हक्काने असलेल्या जमिनीचे मृत्युपत्र करता येईल काय?

☑ कुळ जर कुळ हक्काने जमीन वहिवाटीत असेल तर त्याला कोणाच्याही लाभात मृत्युपत्र करता येणार नाही. कारण कुळ हा पट्टेदार या नात्याने जमीन वहिवाटतो. कुळाचे हक्क, बक्षीसपत्राद्वारे किंवा मृत्युपत्राद्वारे हस्तांतरित होऊ शकत नाहीत, कुळ, आपले हक्क मृत्युपत्र किंवा बक्षीस पत्राद्वारे हस्तांतर करु शकत नाही.

♦ कोणत्या जमिनीबाबत मृत्युपत्र करण्यास कायमचा प्रतिबंध आहे?

☑ महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ अन्वये विविध योजनांतर्गत प्रदान/ अतिक्रमण नियमानुकूल करून गृह निर्माण संस्था, औद्योगिक अस्थापना, शैक्षणिक संस्था, विशेष वसाहत प्रकल्प इत्यादींना प्रदान केलेल्या जमिनी, महानगरपालिका, नगर पालिका व विविध प्राधिकरण यांच्या विकास आराखड्यात समाविष्ट असलेल्या जमिनी अथवा ग्रामपंचायतीकडे गुरचरण अथवा इतर प्रयोजनांसाठी वर्ग केलेल्या जमिनी, देवस्थान इनाम जमिनी, भाडेपट्ट्याने दिलेल्या शासकीय जमिनी, भूदान व ग्रामदान योजने अंतर्गत दिलेल्या जमिनी, महाराष्ट्र खाजगी वने (संपादन) अधिनियम १९७५ तसेच महाराष्ट्र शेत जमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) अधिनियम १९६१ अन्वये चौकशीसाठी प्रलंबित असलेल्या जमिनी, भूसंपादन अधिनियमान्वये संपादीत केलेल्या जमिनी, वक्फ जमिनी या जमिनींचे मृत्युपत्र कोणाच्याही लाभात करता येणार नाही.

♦ आदिवासी खातेदार आणि शेतकऱ्याचे मृत्युपत्र.

☑ मा. सर्वोच्च न्यायालयाने नमूद केले आहे की, जरी हे मान्य केले की, मालमत्ता हस्तांतरण कायद्यांतर्गत, हस्तांतरण हे विद्यमान मालमत्तेचे एका हयात व्यक्तीद्वारे दुसऱ्या हयात व्यक्तीकडे हस्तांतरित करणे आहे आणि मृत्युपत्रात असे कोणतेही हस्तांतरण समाविष्ट नाही, तथापि, जर एखाद्या मृत्युपत्राची अंमलबजावणी कायद्याचे उल्लंघन करत असेल तर, अशा मृत्युपत्राकडे दुर्लक्ष करणे प्राधिकरणासाठी नेहमीच खुले असते आणि अशा मृत्युपत्राच्या आधारावर बदलण्यास नकार देता येऊ शकेल. मृत्युपत्र हे मयत व्यक्तीच्या वारसांपुरते मर्यादित असणे आवश्यक आहे.

त्यानुसार, आदिवासी खातेदार, फक्त त्याच्या भावी वारसांच्या लाभात मृत्युपत्र करू शकेल परंतु अन्य आदिवासी व्यक्ती, बिगर आदिवासी व्यक्ती किंवा अन्य कोणत्याही त्रयस्थ व्यक्तीच्या लाभात मृत्युपत्र करू शकणार नाही. तसेच कोणताही शेतकरी, त्याच्या शेतजमिनीबाबत, बिगर शेतकरी व्यक्तीच्या लाभात मृत्युपत्र करू शकणार नाही.

DR. SANJAY KUNDETKAR, Dy. Collector

♦ **प्रत्येक मृत्युपत्र हे दिवाणी न्यायालयातुन सिद्ध करून आणणे अनिवार्य आहे काय?**

☑ मा. सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक ६ डिसेंबर, २०२१ रोजीच्या निकालाचा अर्थ समजून न घेता, कोत्याही मृत्युपत्राची नोंद आल्यास, उक्त निर्णयाचा संदर्भ देऊन, मृत्युपत्र हे दिवाणी न्यायालयातुन सिद्ध करून आणा असे काही महसूल अधिकारी आग्रह करीत आहेत अशा अनेक तक्रारी प्राप्त होत आहेत. उक्त निकालपत्रात, मा. न्यायालयाने, ''कायद्याच्या स्थायिक प्रस्तावानुसार, हक्काच्या (title) संदर्भात काही विवाद असल्यास'' हा शब्द वापरला आहे.

त्यामुळे, मृत्युपत्राच्या बाबतीत, कोणताही वाद, शंका नसल्यास, असे मृत्युपत्र हे दिवाणी न्यायालयातुन सिद्ध करून आणण्याची आवश्यकता नाही.

तथापि, मृत्युपत्राच्या बाबतीत, कोणताही वाद, शंका हक्काच्या (title) संदर्भात काही विवाद असल्यास, वारस अर्ज आणि स्थानिक चौकशीत उपलब्ध सर्व वारसांची नावे अधिकार अभिलेखात दाखल करावी आणि जो पक्षकार मृत्युपत्राच्या आधारावर हक्काचा दावा करत आहे त्याला योग्य त्या दिवाणी न्यायालयात दाद मागण्यास सांगावे. दिवाणी न्यायालयाच्या निर्णयाच्या आधारे आवश्यक ती फेरफार नोंद पुन्हा नोंदवता येईल. वाद नसलेली मृत्युपत्रे दिवाणी न्यायालयाच्या निर्णयासाठी पाठविण्याची आवश्यकता नाही.

♦ **प्रत्येक मृत्युपत्राचे प्रोबेट मागावे काय?**

☑ मा. उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार, भारतीय उत्तराधिकार कायदा १९२५, कलम ५७ आणि कलम २१३ यांचा एकत्रीत विचार करता, तत्कालीन लेफ्टनंट-गव्हर्नरच्या नियंत्रणाखाली अर्थात कलकत्ता, मद्रास आणि मुंबई येथील उच्च न्यायालयाच्या मूळ दिवाणी अधिकार क्षेत्राबाहेर असलेल्या आणि उक्त कलमांत नमूद अधिकार कक्षेत नसलेल्या मृत्युपत्राच्या किंवा त्या प्रदेशाबाहेर असलेल्या स्थावर मालमत्तेबाबत प्रोबेट घेण्याची आवश्यकता राहणार नाही.

☑ एखाद्या व्यक्तीच्या स्वकष्टार्जित किंवा स्वतंत्र मालमत्तेचे किंवा वडिलोपार्जित मालमत्तेपैकी स्वत:च्या हिश्शाचे तसेच हिंदू महिलेला, हिंदू वारस कायदा १९५६, कलम १४ अन्वये अटी-शर्ती शिवाय मिळालेली मालमत्तेचे मृत्युपत्र कोणाच्याही लाभात करता येऊ शकेल.

♦ हिंदू विधवा स्त्रीला, सन १९५६ नंतर, तिच्या पतीच्या निधनानंतर मिळकत प्राप्त झाली असेल तर ती त्या मिळकतीची संपूर्ण मालक बनते. व त्यानंतर त्या विधवेने लग्न केले तरीही तिला पती निधनानंतर मिळालेल्या मिळकतीवरील तिचा हक्क नष्ट होत नाही.
(संदर्भ: ए.आय.आर. १९७१, मुंबई, ४१३)

♦ वडिलांनी वाटपात मिळालेल्या मिळकतीतून काही मिळकत खरेदी केल्यास ती मिळकत वडिलांच्या मालकीची होईल. त्या मिळकतीत त्यांचा मुलगा किंवा मुलगे सहदायाद (कोपार्सनर) नसतील. *(संदर्भ: ऑल महाराष्ट्र रिपोर्टर २००५ (३), ७८९)*

Dr SANJAY KUNDETKAR, Dy. Collector

♦ हिंदू मॅरेज ॲक्ट, कलम १६ अन्वये वडिलांच्या मिळकतीत अनौरस मुलांचा हिस्सा असतो. परंतु वडिलोपार्जित मिळकतीत अनौरस मुलांचा हिस्सा नसतो. तसेच बेकायदेशिरपणे विवाह केलेली दुसरी पत्नी कधीही वारस ठरणार नाही. तथापि, दुसऱ्या पत्नीपासून झालेली मुले वारस ठरतात.
(संदर्भ: ए.आय.आर. १९९६, एस.सी., १९६३; ए.आय.आर. १९८३, मुंबई, २२२; ए.आय.आर. २००२, गोहत्ती, ९६))

♦ स्त्री-धनाची मिळकत ही त्या स्त्रिच्या संपूर्ण मालकीची असते. तिला त्याची वैयक्तिक इच्छेनुसार विल्हेवाट लावता येते. स्त्री-धन हिंदू एकत्र कुटुंबाच्या मिळकतीचा भाग नसतो.
(संदर्भ: ऑल महाराष्ट्र रिपोर्टर २०११ (६), ४२८ एस.सी.)

♦ मृत्युपत्र हा एक पवित्र दस्त मानला गेला आहे. अशा दस्ताद्वारे मृत व्यक्ती आपल्या संपत्तीच्या विल्हेवाटीबाबतची इच्छा व्यक्त करीत असते. म्हणून मृत्युपत्राचे एक गंभीर व पवित्र दस्त म्हणून पालन केले गेले पाहिजे.
(संदर्भ: रामगोपाल लाल वि. ऐपिनकुमार ४९.ए. आय. आर ४१३)

➲ **शब्दार्थ:**

◆ Testator: अशी व्यक्ती ज्याने मृत्युपूर्वी मृत्युपत्र केले आहे.

◆ Intestate: अशी व्यक्ती ज्याने मृत्युपूर्वी मृत्युपत्र केलेले नाही.

◆ Legatee/Beneficiary: अशी व्यक्ती ज्याला मृत्युपत्रान्वये मालमत्ता मिळाली आहे.

◆ Executor: अशी व्यक्ती ज्याची नेमणूक मृत्युपत्र करणाऱ्याने किंवा आदेशान्वये न्यायालयाने, मयताच्या मालमत्तेचे मृत्युपत्रानुसार वाटप करण्यासाठी केलेली आहे. अशी व्यक्ती मृत्युपत्र करणाऱ्या मयत व्यक्तीची कायदेशीर प्रतिनिधी म्हणून काम करते.

Dr. SANJAY KUNDETKAR, Dy. Collector